संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ०८.०४.२०२५ | अंक नं. ०७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



|| जय आनंद ||

**भक्ती संध्या**
**जैन लाईव्ह कॉन्सर्ट**
प्रस्तुतकर्ता-श्री सागरभाई शहा (मुरबाडवाला)
बुधवार, ०९/०४/२०२५ रोजी रात्री ८.०० वा.
स्थान : गणपती मंदिर प्रांगण, महावीरनगर

|| जय महावीर ||

**भगवान महावीर जन्मकल्याणक भव्य मिरवणूक**
गुरुवार, १०/०४/२०२५ रोजी सायं. ४.०० वा.
स्थान : महावीर नगर जैन धर्मस्थानकापासून निघून ६.३० वा. हडको जैन धर्मस्थानकाजवळ येईल.

वरील कार्यक्रमात सर्वांनी सहपरिवार सामील होऊन कार्यक्रमाचा आनंद घ्यावा ही विनंती

✻ आयोजक : अरिहंत युवक मंडळ ✻
हडको, महावीरनगर, सावेडी, नागापुर परिसर, अ.नगर


JITO AHILYANAGAR

# विश्व नवकार महामंत्र दिवस

विशेष प्रस्तुती

## ॥ नवकार नाद ॥

अहिल्यानगर के अनेक प्रसिद्ध कलाकारों द्वारा प्रस्तुत नवकार मधुर धुन

**9 April ’25 I Wednesday**

**Time 7:02 AM to 9:36 AM**

**विश्व कल्याण के लिए जुड़ें, नवकार महामंत्र का जाप करें**

Venue

## Dharmik Pariksha Board, Ahilyanagar

For Registration Ahilyanagar
**https://bit.ly/vishwanavkardivas**

Registration Partner
JioEvents

Powered by
Chandrakantji Munot Foundation
Compassion has power to change

Gold Partner
ARVIND FOOTWEAR PVT LTD — A VENTURE BY BAFNA GROUP
By Akshay Narendra Bafna

Gautam Prasadi
Saideep GROUP
By Shudhir, Nilesh Chopda & Family

Silver Partner
elite — Returnable Packaging Solutions
By Abhijit Vinod Gandhi

सौजन्य से-
MAHAVIR GROUP
YOUR VISION, OUR REALTY
श्री राजेश संतोषजी भंडारी

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## 'महावीर' समजून घ्यावे लागतील

गुरुवार १० एप्रिलला भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव साजरा होईल. त्यानिमित्त शहराच्या विविध भागात आकर्षक चौक सुशोभिकरण, भव्य पण शांततेत शोभायात्रा, स्थानक, मंदिरात धार्मिक दर्शन, व्याख्याने इ.चे आयोजन होईल.

भगवान महावीर जैनीयांचे २४ वे तीर्थंकर. सत्य, अहिंसा, परमोधर्माचे ते खरे अवतार व आदर्श. समाजाच्या अवचेतन म्हणजेच काहीशा झोपलेल्या मन मानसिकतेवर अहिंसा तत्त्वाचा जो काही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम आहे ना तो भ. महावीरांचेच तत्त्व आहे.

आम्हाला विशेषतः सर्वप्रथम जैनीयांना भगवान महावीर अभ्यासावे लागतील. त्यांच्याविषयी साधु साध्वींकडून विस्तृत माहिती घ्यावी लागेल.

महावीरांची तत्त्वप्रणाली १००% अनुसरणे ही काळाची गरज आहे. खासकरून आजच्या अनैतिक, भ्रष्टाचाराने बोकाळलेल्या वातावरणात सत्याची कास धरून अहिंसेला पाठबळ देणे अत्यावश्यक.

काय दुर्दैव पहा. म. गांधींनी अहिंसेच्या मार्गाने स्वराज्याचा मार्ग मिळवला. पण तो मार्ग दाखवणाऱ्या भ. महावीरांची राष्ट्राला तितकीशी आठवण होत नाही.

शाकाहार, सत्य, प्राण्यांची सुरक्षा, मनुष्याचे स्वातंत्र्य, पर्यावरण यावर चिंतन वाढले असले तरी महावीरांनी याचा पाया रचला होता हे विसरता कामा नये.

आपल्याकडे महापुरुष व दैवतप्राप्त झालेले यांची फक्त पूजा, मिरवणूक काढून जयजयकार केला जातो. त्यांच्या गुणात्मक जीवनाच्या कार्याची गांभीर्याने दखल, प्रचार प्रसार होतच नाही. हीच वेळ आहे महावीरांच्या तत्त्वांचा जगभरात दरवळ जावा नाहीतर महाविनाश अटळ आहे. भ. महावीर स्वामींच्या जीवनाची महती सर्वदूर जावो हीच प्रार्थना.

– किशोर गांधी.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

# फ्लिपकार्ट कंपनीत गुंतवणुकीतून ज्यादा परतावा देण्याच्या अमिषाने आर्मी हॉस्पिटलमध्ये कार्यरत महिलेची ऑनलाईन आर्थिक फसवणूक

नगर – नगर शहराजवळील आर्मीच्या हॉस्पिटल मध्ये काम करणाऱ्या ३२ वर्षीय महिलेला फ्लिपकार्ट कंपनीत गुंतवणूक केल्यास ज्यादा परतावा देण्याचे अमिष दाखवून सायबर गुन्हेगारांनी तिची ऑनलाईन ३ लाख ३० हजार ४७० रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. याबाबत अज्ञात गुन्हेगाराविरुद्ध भिंगार कम्प पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर फिर्यादी महिला ही आर्मीच्या एम एस हॉस्पिटल मध्ये नर्स म्हणून कार्यरत असून हॉस्पिटल जवळच असलेल्या एमआयआर सी क्वार्टर मध्येच रहावयास आहेत. त्यांना १८ मार्च रोजी मोबाईल वर एका अनोळखी व्यक्तीचा कॉल आला. त्याने आपण फ्लिपकार्ट कंपनीमधून बोलत असून आपण फ्लिपकार्ट कंपनीत गुंतवणूक केल्यास आपणास ज्यादा परतावा दिला जाईल असे आमिष दाखवले. त्यामुळे त्यांनी सुरुवातीला १०० रुपये त्या व्यक्तीने पाठविलेल्या लिंक वर ऑनलाईन पाठविले. त्या नंतर त्यांना दुप्पट पैसे मिळाले. त्यांनी पुन्हा ४ – ५ वेळा काही पैसे गुंतवल्यावर त्यांना ज्यादा परतावा मिळू लागला.

त्यामुळे त्यांचा विश्वास बसला व त्यांनी त्यांच्या बँक खात्यात असलेली ३ लाख ३० हजार ४७० रुपयांची रक्कम लिंकवर पाठविली. ज्यादा रक्कम मिळताच सदरील व्यक्तींनी फिर्यादी यांच्याशी असलेला संपर्क बंद केला. त्यांचे फोन घेणेही बंद केले. हा सर्व प्रकार १८ मार्च ते २५ मार्च दरम्यान घडला. त्यानंतर अनेकदा संपर्क करूनही त्या व्यक्तींशी संपर्क न झाल्याने आणि गुंतवलेले पैसेही परत न मिळाल्याने आपली फसवणूक झाली असल्याचे फिर्यादी महिलेच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी भिंगार कम्प पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात सायबर गुन्हेगाराविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८ (४), ३१६ (२)प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

### सोशल मिडीया वापरताना काळजी घ्या, जागरूक रहा

अलीकडच्या काळात आपण अनेक गोष्टींसाठी ऑनलाईन पेमेंट करण्याला प्राधान्य देतो. ऑनलाईन पेमेंट करणं सुलभ असलं तरी सायबर गुन्हेगारांची कायमच अशा प्रकारच्या व्यवहारांवर नजर असते आणि ते विविध मार्गांनी लोकांची फसवणूक करतात. सोशल मिडियावर ज्यादा परताव्याचे आमिष दाखवून फसवणूक करण्याचे प्रकार वाढले आहेत. कोणीही अनोळखी व्यक्ती आपणास कॉल अथवा मेसेज करून आमिष दाखवतात. आपणही कुठलीही शहानिशा न करता त्या अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवून आपली फसगत करून घेतो. सायबर गुन्हेगार लोकांना फसविण्यासाठी आता नवनवीन फंडे वापरत आहेत. त्यामुळे सोशल मिडीयाचा वापर काळजीपूर्वक करावा, कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या अमिषाला बळी पडू नये असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

नगर – भरधाव वेगात जाणाऱ्या अज्ञात वाहनाने दुचाकीस्वारास धडक दिली. या धडकेत दुचाकी स्वाराचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला. ही घटना नगर-सोलापूर महामार्गावर दरेवाडी येथे ७ एप्रिल रोजी रात्री घडली. रोहित अशोक शिंदे (वय ३२,रा. समाज मंदिर जवळ, दरेवाडी, ता. नगर) असे मयताचे नाव आहे. मयत रोहित शिंदे हे त्यांच्या दुचाकीने दरेवाडी येथे जात असताना भरधाव वेगात आलेल्या अज्ञात वाहणारे त्यांना धडक दिली. या धडकेत त्यांच्या डोक्याला मार लागल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यांना त्यांचा भाऊ अक्षय अशोक शिंदे याने औषधोपचाराकरिता खासगी रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलिसांनी डॉ. अनंत गायकवाड व प्रदीप कंठाळे (इंडो आयरिश हॉस्पिटल अ.नगर) यांनी दिलेल्या माहितीवरून अकस्मात मृत्यूची नोंद केली. पुढील तपास पोलीस हवालदार महेश विधाते करीत आहेत.

## श्रीरामनवमी मिरवणुकीत डीजे लावल्याने मंडळ अध्यक्ष व डीजेमालकांवर गुन्हे दाखल

नगर – सर्वोच्च न्यायालयाने ध्वनिक्षेपकाबाबत घालून केलेल्या अटी व शर्तींचे उल्लंघन करुन श्रीराम नवमी मिरवणुकीत मोठ्या आवाजात डीजे सिस्टीम लावून ध्वनी प्रदूषण करणाऱ्या दोन मंडळांच्या अध्यक्ष व डीजे मालकांवर कोतवाली पोलिसांनी तर दोन मंडळांच्या अध्यक्ष व डीजे मालकांवर तोफखाना पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

श्रीराम नवमी जयंती मंडळांनी डीजे चा आवाज मर्यादित ठेवावा, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे उल्लंघन करून ध्वनी प्रदूषण करु नये, याबाबतच्या सुचना पोलिसांनी दिलेल्या असतानाही मिरवणुकी दरम्यान हिंदू राष्ट्र सेना मंडळ व सकल हिंदू समाज मंडळाने पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनेकडे दुर्लक्ष करून मोठ्या आवाजात गाणी लावून आवेशपूर्ण घोषणाबाजी केली. तसेच सर्वोच्च न्यायालयाने ध्वनी क्षेपकाबाबत घालून दिलेल्या अटी व शर्तीची उल्लंघन करून मोठ्या आवाजात डीजे लावून ध्वनी प्रदूषण केले. त्यामुळे कोतवाली पोलिसांनी मंडळाचे अध्यक्ष शुभम मनोज कर्डिले (रा. शेरकर गल्ली, सर्जेपुरा) व डीजे मालक महेश दत्तात्रय शिंदे (रा. तुषार बेकरी किशकिंदा नगर, पुणे), सकल हिंदू समाज मंडळाचे अध्यक्ष दिगंबर लक्ष्मण गेंट्याल (रा. सावेडी अ.नगर), डी जे मालक वैभव विठ्ठल बोरकर (रा. लोणी काळभोर, ता. हवेली, जिल्हा पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. तसेच तोफखाना पोलिसांनी श्रीराम सेना बोल्हेगाव मंडळाचे अध्यक्ष प्रतीक कांबळे (रा. बोल्हेगाव), डीजे मालक रितेश राजेश पाटील (रा. सांगली), वास्तव ग्रुप सावेडी मंडळाचे अध्यक्ष दीपक ज्ञानेश्वर नाटकर (रा. कसबे वस्ती, तपोवन रोड अ.नगर), डीजे मालक सुरज जयवंत घारे (रा. घारेवाडी, कराड, सातारा) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २२३ सह पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ३, १५ व ध्वनी प्रदूषण अधिनियम २००० चे कलम ३, ४, ५, ६ अन्वये दोन वेगवेगळ्या गुन्ह्याची नोंद केली.

## स्विफ्ट डिझायर कार अचानक पेट घेऊन जळून खाक

नगर – छत्रपती संभाजीनगरकडून नगरमार्गे पुण्याकडे जात असलेल्या स्विफ्ट डिझायर कारने शहरातील सरोज पेट्रोल पंपाजवळ अचानक पेट घेतला. या आगीत कार जळून खाक झाली. सुदैवाने या दुर्घटनेत कुठलीही जीवितहानी झाली नाही. ही घटना ८ एप्रिलला पहाटे पावणे दोनच्या सुमारास घडली.



(छाया – बबलू शेख)

कारने पेट घेतल्यानंतर कारचालकाने आरडाओरडा केला. तो ऐकून परिसरातील असलम हमीद खान हे त्याचे मित्र बाबा शेख यांच्यासह मदतीस धावले. त्यावेळी कार मध्ये एक मुलगा दिसला त्यांनी त्या मुलास सुखरूप बाहेर काढले. त्यानंतर महापालिकेच्या अग्नीशमन दलाला फोन करून माहिती दिली. माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धावत घेत आग विझविली. मात्र तोपर्यंत कार पूर्णपणे जळून खाक झाली होती.

## शिवीगाळ का केली अशी विचारणा करुन एकास बेदम मारहाण

नगर – काहीएक कारण नसताना तू मला शिवीगाळ का केलीस असे म्हणून युवकास शिवीगाळ दमदाटी करीत दगडाने डोक्यात मारुन जखमी केले. तसेच जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याची घटना ५ एप्रिल रोजी दुपारी बोल्हेगाव गावठाण येथील शिवबा चौक येथे घडली.

याबाबत प्रदीप विश्वनाथ कदम (वय ३२, रा.बोल्हेगाव गावठाण, जिल्हा परिषद शाळा मागे, बोल्हेगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की ते मुलासह मॅगी आणण्यासाठी किराणा दुकानात जात असताना शिवबा चौक येथे योगेश जाधव (रा. बोल्हेगाव) हा तेथे आला व काहीएक कारण असताना, मला शिवी का दिली असे विचारू लागला तेव्हा प्रदीप कदम यांनी मी शिवी दिली नाही असे समजावून सांगण्याचा प्रयत्न केला.परंतू योगेश जाधव याने शिवीगाळ करून जवळ पडलेल्या दगड उचलून कदम यांच्या डोक्यात मारून डोके फोडून त्यांना जखमी केले व पुन्हा माझ्या नादी लागला तर जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली.

याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी प्रदीप कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन योगेश जाधव यांच्याविरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे.

## मदनलाल शर्मा यांचे अल्प आजाराने निधन

राशीन – राशीन येथील व्यापारी मदनलाल तेजमल शर्मा (वय ७०) यांचे ७ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर राशीन (ता.कर्जत) येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



ॲड. गणेश शर्मा यांचे ते वडील होत तर ॲड. आर. टी. शर्मा यांचे ते बंधू होत. त्यांच्या मागे ३ मुले, ३ भाऊ, पत्नी, भावजया, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## 'ब्रह्माकुमारी'च्या मुख्य प्रशासिका दादी रतनमोहिनी कालवश

आबू रोड – प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या मुख्य प्रशसिका राजयोगीनी ब्रह्माकुमारी रतनमोहिनीजी यांचे ८ एप्रिल रोजी सकाळी १.२० मिनीटांनी अहमदाबाद येथील जायडस हॉस्पिटल मध्ये उपचारादरम्यान निधन झाले. त्यांचे अंत्यसंस्कार १० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता ब्रह्माकुमारीज् शांतीवन येथे करण्यात येतील. ब्रह्माकुमारी रतनमोहिनीदादी गेल्या दोन दिवसांपासून श्वासाच्या अडचणीमुळे अस्वस्थ्य होत्या. त्यांना तातडीने अहमदाबाद येथील जायडस हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. वैद्यकिय टीमने शर्थीचे प्रयत्न केले तथापि, त्यांनी प्राणत्याग केले.



राजयोगाच्या नियमित साधक असलेल्या ब्रह्माकुमारीज् संस्थेच्या प्रमुख पदी असलेल्या वय १०४ वर्षे होते. शेवटपर्यंत त्यांची प्रकृती स्वस्थ्य होती. अनुशासन आणि संयमीत जीवन जगलेल्या दादीजींनी देश-विदेशातील लाखों व्यक्तिंच्या जीवनात मूल्यसंस्कार रुजविलेत, जगातील सर्वांत मोठ्या आध्यात्मिक संस्थेचे नेतृत्व करीत असूनही हसतमुखाने आणि मधुरवाणीने त्यांनी लाखों राजयोगी परिवारांना कुटुंबप्रमुखाचे प्रेम दिले.

ज्या भूमीत त्यांनी देशविदेशातील व्यक्तिंना जीवनाची दिशा दाखविली अशा आबूरोड येथील पवित्र शांतीवन येथे त्यांचे अंत्यसंस्कार १० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता होणार आहेत. तत्पूर्वी ८ एप्रिल रोजी शांतीवन येथील सभागृहात त्यांच्या पार्थीवाचे दर्शन घेता येईल. ९ एप्रिल रोजी ब्रह्माकुमारीज्चे सर्व प्रमुख वास्तु पांडव भवन येथील बाबांचा कमरा, शांती स्तंभ, बाबा कुटीया, हिस्ट्री हॉल या आध्यात्मिक चार धाम येथे दर्शनार्थ नेण्यात येईल तसेच ओमशांती भवन, ज्ञानसरोवर, पीसपार्क येथून परत शांतीवन येथील कॉन्फ्रेन्स हॉल येथे अंतिम दर्शनार्थ ठेवण्यात येईल.

# मंदिरात तोडफोड करत हनुमान मूर्तीची विटंबना

## नागरिकांनी आक्रमक होत केला रास्ता रोको

नगर – नगर –जामखेड रोडवरील सारोळा बद्दी (ता.नगर) गावाच्या परिसरातील अचानकवाडी भागातील हनुमान मंदिरातील मूर्तीची अज्ञात समाजकंटकांनी विटंबना करण्याचा प्रयत्न केल्याची घटना ७ एप्रिल रोजी दुपारी निदर्शनास आली. ही बाब निदर्शनास येताच परिसरातील नागरिकांनी आक्रमक होत रास्ता रोको आंदोलन केले. याबाबत पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेत आंदोलकांशी चर्चा करून संबंधितावर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेतले. दरम्यान सदरचा प्रकार एका मनोरुग्ण व्यक्तीने केल्याचे समोर आले असून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे.

सारोळा बद्दी शिवारातील अचानकवाडी येथील हनुमान मंदिर लोकवस्तीपासून काही अंतरावर आहे. अज्ञात समाजकंटकांनी या मंदिरातील हनुमान मूर्तीवर हिरवा गुलाल टाकला. तसेच मुर्तीच्या पाठीमागे असलेल्या जागेत काहीतरी जाळले. दुपारी ४ च्या सुमारास काही गावकऱ्यांच्या ही घटना लक्षात आली. त्याची बातमी गावात पसरताच गावकरी त्या ठिकाणी गोळा झाले. गावकऱ्यांनी या घटनेचा निषेध करत रास्ता रोको आंदोलन सुरु केले. या अचानक केलेल्या आंदोलनामुळे महामार्गावर वाहनाच्या दोन्ही बाजूनी दूरवर रांगा लागल्या होत्या. याबाबत नगर तालुका पोलिसांना माहिती समजताच त्यांनी घटनास्थळी धाव घेत आंदोलन करणाऱ्या नागरिकांना संबंधित व्यक्तीवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर हे आंदोलन मागे घेतले.

दरम्यान याबाबत नगर तालुका पोलिस ठाण्यात रात्री उशिरा विशाल बाळासाहेब बोरुडे (वय ३५, रा.सारोळा बद्दी, ता.नगर) यांच्या फिर्यादीवरून अनोळखी इसमाविरुद्ध धार्मिक भावना दुखावल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मनोरुग्ण आरोपी पोलिसांच्या ताब्यात

या घटनेची माहिती मिळाल्यावर पोलिस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलिस अधिक्षक प्रशांत खैरे, नगर ग्रामीणचे पोलिस उपअधीक्षक संपतराव भोसले, नगर तालुका पोलिस ठाण्याचे स.पो.नि. प्रल्हाद गिते यांच्यासह पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेत कसून तपास सुरु केला. त्यावेळी पोलिस तपासात समोर आलेल्या बाबीची माहिती देताना स.पो.नि.गिते म्हणाले की, अचानकवाडी येथील हनुमान मंदिरात एका मनोरुग्ण व्यक्तीने मंदिरात असलेली रांगोळी एकत्र करून ती सर्वत्र पसरवली हे करताना त्याच्यापासून तेथील दिवा खाली पडला. त्यामुळे मूर्तीच्या मागे ठेवलेले अगरबत्ती, धूप, कापूर या सर्व वस्तूंनी पेट घेतला त्यामुळे आजूबाजूला काळवंडले आहे. हनुमान मंदिरामध्ये मूर्तीची विटंबना करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे दिसून आले.

याबाबत गावातील व परिसरातील काही लोकांकडे विचारपूस केली असता सदर ठिकाणी दोन दिवसांपासून एक मनोरुग्ण इसम फिरताना दिसत असल्याचे सांगितले, त्यावरून बायपास रोडवर शोध घेतला असता गावकऱ्यांच्या समोर त्याची पाहणी केली, तेव्हा त्याच्या पँटवर व हाताच्या नखामध्ये वरील रंगाची मिक्स केलेली रांगोळी मिळून आली आहे. तरी सदरच्या व्यक्तीला तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. नागरिकानी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन स.पो.नि. गिते यांनी केले आहे.

## लहान मुलांच्या भांडणावरुन पती-पत्नीला मारहाण

नगर – लहान मुलांच्या झालेल्या भांडणाबाबत सांगावयास गेलेल्या पती पत्नीस शिवीगाळ दमदाटी करीत मारहाण केल्याची घटना तांबटकर गल्ली, कापडबाजार येथे ६ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता घडली.

या बाबत अखलाख अल्फाज खान (वय ३८, रा.तांबटकर गल्ली, कापडबाजार) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की त्यांची ६ वर्ष वयाची मुलगी व त्यांच्या गल्लीत राहणारे राजासाब सय्यद (पूर्ण नाव माहित नाही) यांच्या मुलांमध्ये खेळत असताना भांडण झाले. त्याबाबत सांगण्याकरिता खान पतिपत्नी राजासाब यांच्या घरी गेले असता त्यांच्या घरासमोर उभे राहून त्यांना सांगत असताना तू मला सांगू नकोस असे म्हणून राजासाब याने खान पती पत्नीस शिवीगाळ केली. तेव्हा खान पति पत्नी घराकडे जात असताना ते अल्ताफ पिठाची गिरणी जवळ आले असता राजासाब हे पत्नीसह त्यांच्या मागे आले. आणि खान पती पत्नीस मारहाण केली. राजासाब याने कोणत्यातरी शस्त्राने डोक्यात मारले. आणि हाताच्या नखाने पाठीवर ओरबडलें. तेव्हा शाहिद तस्लिम खान (तांबटकर गल्ली) हा तेथे आला. आणि तुम्ही आमच्या नादी लागू नका. नाहीतर तुम्हाला उचलून घेऊन जाऊ अशी धमकी देऊन शिवीगाळ केली. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी अखलाख खान यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन राजासाब सय्यद,सोमय्या सय्यद, शाहिद खान यांच्या विरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे.

## विहिरीवरील वीज पंपांची चोरी

नगर – शेत जमिनीतील विहिरीवर बसविलेल्या तीन इलेक्ट्रिक मोटार कोणीतरी अज्ञात चोरट्याने केबल कापून चोरून नेल्याची घटना ३० मार्च रोजी दुपारी १ ते ५ एप्रिल रोजी दुपारी १ वाजण्याच्या दरम्यान नगर तालुक्यातील पिंपळगाव उजैनी शिवारातील शेत जमिनीत घडली.

याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात विजय कुंडलिक वाघ (वय ४६, रा. पिंपळगाव उज्जैनी, ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की त्यांच्या शेतजमिनीतील विहिरीवर बसवलेली ५ हजार रुपये किमतीची ३ हॉर्स पॉवर क्षमतेची अँकर कंपनीची इलेक्ट्रिक मोटार, ३ हजार रुपये किमतीची १ हॉर्स पॉवर क्षमतेची अँकर कंपनीची स्टील रंगाची इलेक्ट्रिक मोटार आणि योगेश जगन्नाथ वाघ यांच्या शेतातील विहिरीवरील ३ हजार रुपये किमतीची १ हॉर्स पॉवर क्षमतेची क्रॉम्प्टन कंपनीची इलेक्ट्रिक मोटार कोणीतरी अज्ञात चोरट्याने केबल कापून चोरून नेल्या.

याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी विजय वाघ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.



हनुमान चालिसा पाठ

बुधवार दि. ०९/०४/२०२५
रात्री ८.३० ते १०.३०

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**
**जय बजरंग मित्रमंडळ,** अभिषेक हॉटेल शेजारी, गवांदे क्लास शेजारी, लेंडकर मळा, बालिकाश्रम रोड
संदीप लेंडकर- ९८६०१३९०६३, ९८३४२४२२४८.

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एमआयडीसी, अहिल्यानगर**
**शिवमित्र प्रतिष्ठान,** गंजबाजार, सराफ बाजार, गांजेगल्ली
संकेत गुरव- ९४२३१६२६७२

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) श्रीराम मंदिर, नवीपेठ**
**शांती ऑडिओ मित्रमंडळ एवम् राधाकृष्ण मित्रमंडळ**
नेहरू मार्केट, चितळे रोड.

**श्री संकटमोचन हनुमान सत्संग मंडळ, अहिल्यानगर**
**श्री नित्यसेवा सोसायटी,** वसंत टेकडी, छ. संभाजीनगर रोड.

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा गल्ली, गंजबाजार**
**राज ज्योतीनगर कॉलनी मित्र परिवार,** बुरुडगाव रोड, तिर्थंकर कॉलनीच्या पुढे, मो. ९८२३०२४७७३.

## निंबळकमधून अल्पवयीन मुलाचे अपहरण

नगर – नगर तालुक्यातील निंबळक शिवारातून कोणीतरी अज्ञात इसमाने, अज्ञात कारणासाठी १६ वर्षीय अल्पवयीन मुलाचे अपहरण केल्याची घटना ६ एप्रिल रोजी रात्री ११ ते ७ एप्रिल रोजी रात्री १२.३० वाजण्याच्या दरम्यान घडली. अपहृत मुलाच्या नातेवाईकांनी त्याचा निंबळक परिसर, नगर शहरात शोध घेतला असता तो कोठेही मिळून आला नाही. याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी अपहृत मुलाच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाच्या गुन्ह्याची नोंद केली. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक परदेशी हे करीत आहे.

# अहिल्यानगर महानगरपालिकेची कारवाई अन्यायकारक

### कायद्यानुसार मोजमाप होईपर्यंत कुठलीही तोडफोड होऊ नये : नगरसेवक योगीराज गाडे



कायद्यानुसार मोजमाप होईपर्यंत कुठलीही तोडफोड होऊ नये, या मागणीचे निवेदन आयुक्त यशवंत डांगे यांना देताना माजी नगरसेवक योगीराज गाडे आदी.

नगर – अहिल्यनगर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने सावेडीमधील वर्षा कॉलनी, एक्यानगर, मॉडेल कॉलनी, अभियंता कॉलनी, मिस्कीन नगर, जॉगिंग ट्रॅक परिसर, गुलमोहर रोड, पाईपलाईन रोड आणि सावेडी उपनगर या परिसरातील अनेक नागरिकांच्या घरांवर, भिंतींवर आणि कंपाउंडवर अतिक्रमणाच्या खोट्या चिन्हांकनांमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. सदर चिन्हांकन करताना महानगरपालिका प्रशासनाने ना कोणतीही लेखी नोटीस दिली, ना कायदेशीर मोजमाप केले आणि सर्वात चिंतेची गोष्ट म्हणजे नागरिकांच्या संमतीशिवाय त्यांच्या खाजगी मालमत्तेत प्रवेश करून ही कारवाई केली गेली. काही ठिकाणी नागरिकांना तोंडी सांगण्यात आलं की ८ दिवसांत या बांधकामांवर कारवाई केली जाईल. ही संपूर्ण पद्धत कायद्याच्या विरुद्ध असून, नागरिकांना मानसिक त्रास देणारी आणि त्यांच्या मूलभूत हक्कांवर घाला घालणारी आहे.

या पार्श्वभूमीवर माजी नगरसेवक योगीराज गाडे यांनी महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदन दिले असून, या सर्व चिन्हांकनांची फेरतपासणी कायदेशीर मार्गाने, मोजमाप करून आणि नागरिकांच्या उपस्थितीत पारदर्शकपणे करावी, तसेच कोणतीही कारवाई करण्याआधी संबंधितांना लेखी नोटीस देणे आवश्यक असल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे.

महानगरपालिका नागरिकांवर अन्याय न करता कायद्याच्या चौकटीत पारदर्शक पद्धतीने काम करावी. अन्यथा नागरिकांचा विश्वास संस्थेवरून उडेल, असे गाडे यांनी सांगितले.

या वेळी प्रशांत आहेर, जोशी विश्वकर, प्रसाद जोशी, सारंग दिवटे, ओंकार पाटील, अनिरुद्ध ठोंबरे, वैभव सांगळे, भागचंद लोखंडे, राज गोरे, करण पुंड, विराज भागवत, सार्थक गाडे, सोमनाथ गाडे, अथर्व पादिर, प्रथमेश महिंद्रकर आदी उपस्थित होते.

# गृहिणी

## आरोग्य

### दररोज प्या वेलचीचे पाणी

पचनाशी संबंधित समस्या असेल तर रोज सकाळी अंशपोटी वेलचीचे पाणी प्या, त्याने बद्धकोष्ठता होत नाही. वेलचीमध्ये मॅग्नेशिअम, कॅल्शिअम असते जे आरोग्यासाठी लाभदायी असते. ते पाणी प्यायल्याने फॅट वेगाने कमी होते.

वेलचीत ॲंटी-ऑक्सीडेंटस् असतात, जे रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास मदत करतात. वेलचीचं पाणी प्यायल्याने रक्तदाब नियंत्रीत राहतो.

## पाककला

### आलू पालक भाजी

**साहित्य :** १ जुडे ताजी पालक, २ बटाटा, ४, ५ मिरच्या, ९, १० लसूण, १ टोमॅटो, १ सर्व्हिंग स्पून मोहरीचे तेल, मोहरी, हिंग, १/२ स्पून हळद आणि धणेपूड, मीठ

**कृती :** प्रथम ताजी पालक दोन तीन वेळा स्वच्छ धुवा नंतर छान चिरून घ्या. नंतर २ बटाटा, ४, ५ मिरच्या आणि ९, १० लसूण, १ टोमॅटो चिरून घ्या. नंतर कढई गरम करून एक सर्व्हिंग स्पून मोहरीचे तेल ओता मग एक मिनिटानंतर मोहरी टाका, हिंग घाला मग त्यात चिरलेली मिरची (लाल व हिरवी) आणि लसूण घाला, पुन्हा परता. अर्ध्या मिनिटांनंतर हळद आणि धणेपूड घाला, पुन्हा हलवा नंतर एक चिरलेला टोमॅटो घाला. एक मिनिटानंतर त्यात चिरलेली पालक आणि बटाटे घालून नीट मिक्स करा आणि मीठ टाका आणि पुन्हा मिसळा आणि कढईचे झाकण झाकून ठेवा. चार मिनिटे शिजवा नंतर उघडा आणि पुन्हा मिसळा आणि पुन्हा चार पाच मिनिटे मंद आचेवर शिजवा व गॅस बंद करा.

## वास्तू

### तवा कुठे ठेवाल

तवा ठेवण्यामध्ये आणि उपयोग करण्यामध्ये गृहिणी अनेक चुका करतात. त्यामुळे वास्तुमध्ये असंतुलन निर्माण होते आणि कुटुंबाच्या सुखसमृद्धीवर त्याचा विपरीत परिणाम होतो त्याचप्रमाणे तव्याचा वापर करुन झाल्यावर स्वच्छ न करता ठेवल्याने नकारात्मक ऊर्जा निर्माण होते आणि तवा उलटा ठेवणेही अशुभ मानले जाते.

## सल्ला

नारळ पाण्याच्या नियमीत सेवनाने युरीनचे प्रमाण वाढते आणि किडनीमध्ये स्टोन तयार होणारे खनिज कमी होतात.

## सौंदर्य

डोळ्यांखालील काळी वर्तुळे कमी करण्यासाठी व्हिटॅमिन ए, सी आणि के महत्त्वाची असतात. पपईमध्ये व्हिटॅमिन सी आणि ए असते, जे त्वचेला उजळवते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. ९ एप्रिल २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, चैत्र शुक्लपक्ष, मघा ०७|५७, सूर्योदय ०६ वा. २२ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : नवीन मित्रांच्या ओळखी होतील. भविष्यात त्यांचा उपयोग होईल. सरकारी कामे सफल होतील.

**वृषभ** : सहकार्यांबरोबर झालेल्या मतभेदांचे निराकरण होईल. अधिकार क्षेत्रात वाढ होईल. घरात शुभ कार्य ठरेल.

**मिथुन** : मोठ्यांचा सहवास लाभेल. विदेशात असलेल्या संततीच्या शुभवार्ता मिळतील. स्पर्धा, पैजा जिंकाल.

**कर्क** : व्यवसाय करणाऱ्यांना आज फारच लाभदायक दिवस आहे. मित्राच्या भेटीतून आनंद मिळेल.

**सिंह** : भेटीचे योग येतील. अचानक धनलाभ संभवतो. प्रवास होतील. काम करायला उत्साह वाटणार नाही.

**कन्या** : इतरांमुळे राग अनावर होईल. पत्नीची वाद होतील.

**तूळ** : नवीन कार्याचा श्रीगणेशा कराल. सरकार विरोधी कारवाया केल्याने अडचणीत याल.

**वृश्चिक** : आर्थिक लाभ होईल. आजारी व्यक्तीच्या प्रकृतीत सुधारणा होईल. मातृचिंता सतावेल.

**धनु** : प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवाल. चर्चा-वादविवाद यातही तुमचा प्रभाव राहील. सामाजिक प्रतिष्ठा लाभेल.

**मकर** : कोर्ट कचेरी प्रकरणात यश मिळेल. नवीन मालमत्ता खरेदीसाठी चांगला मुहूर्त आहे.

**कुंभ** : मित्राचा सहवास लाभदायी ठरेल. कामात सांभाळूनच पुढे चालाल.

**मीन** : राजकारणी लोकांसाठी शुभ दिवस आहे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!


नवरा - साजणी, तुझ्या केसांच्या मखमली जाळ्याला सांभाळत जा गं जरा
बायको (लाजत) - तुम्ही पण ना इश्श
नवरा - आई शप्पथ जर पुन्हा जेवणात तुझा केस सापडला ना,
तर साजणीवरून गजनी बनवून टाकेल तुला

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी


※ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोणत्या राज्यात सावराकुंड जलविद्युत प्रकल्पाचे उद्‌घाटन केले? - हिमाचल प्रदेश

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७१५१ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७१५० चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) भारताचे दिल्लीत असलेले कायदेमंडळ; पार्लमेंट ४) सांप्रतकाळी; वर्तमान स्थितीत ८) भाट; स्तुतिपाठक ९) दशा; अवस्था; वाईट स्थिती १०) विश्वासघातकी १२) एक तंतुवाद्य १३) मेंदूवर परिणाम झाल्याने विचित्र वागणे १४) मिठाची चव १५) पोरगा; छोकरा ; पुत्र १६) लहान; छोटा; लघू १७) गुंडगिरी; मवालीगिरी १९) मध्यस्थ; अडत्या २१) धमनी; रक्तवाहिनी; शीर २२) मुस्लीम पुरुषाचे एक नाव

**उभे शब्द :-** १) फिरणे; बाधा २) हार; बरोबरी; माला; तुलना ३) दणदण असा मोठा व एकसारखा येणारा आवाज ५) होडी; नाव; बोट ६) आजच्या आदला दिवस ७) वाईट सवय; खोड ११) आंब्याचे बी; कोय १२) शूर पुरुष; योद्धा १३) एक प्रकारची वनस्पती; लता १४) उच्च कूळ; चांगले घराणे १५) मजुरांवर देखरेख करणारा १६) लहान; छोटा १८) नोकर; चाकर; पाईक २०) शंभर हजार; ध्यान; लाख

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : संघर्ष कसा करायचा हे पित्याकडून शिकावे तर संस्कार कसे घ्यायचे हे मातेकडून शिकावे.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### मोती कसे तयार होतात?

मोती शिंपल्यात तयार होतात हे आपल्याला पूर्वीपासून माहीत आहे. 'पडतील स्वाती तर पिकतील मोती' ही म्हणही आपण वापरत आलोय. सिलोनमध्ये रहिवासी आणि मलबारी लोक मोती काढण्याच्या विद्येत प्रवीण असल्याचे युरोपीय प्रवाशांनी लिहून ठेवले आहे. मोती शिंपल्यात तयार होतात हे आपल्याला माहीत होते; पण जपानी लोकांनी मोती कसे तयार होतात हे शोधून मोत्यांच्या निर्मितीप्रक्रियेचे रहस्य जगापुढे आणले आणि घाऊक प्रमाणात मोत्यांची निर्मिती सुरू केली.

समुद्र किनाऱ्यावर आपण शिंपले बघतो. यात 'कालव' नावाचा प्राणी असतो. या प्राण्याला जेव्हा शिंपल्यात शिरलेला एखादा वाळूचा कण टोचू लागतो तेव्हा, आपल्या पायात काटा गेल्यावर त्याभोवती ज्याप्रमाणे कुरूप होते, त्याप्रमाणे त्या कणाभोवती कालवाच्या शरीरातून शिंपल्याच्या मुख्य घटकाचे- कॅल्शियम कार्बोनेटचे लेप बसतात. हाच मोती होय. बहुदा हे मोती पांढऱ्या रंगाचे असतात. मात्र काही वेळा ते गुलाबी व काळेही असू शकतात.

कल्चर्ड मोतीही असेच बनतात. फक्त ते मोत्यांच्या शेतीत तयार होतात. 'मोत्यांची शेती' हा खास जपानी प्रकार असून तो आता जगन्मान्य झाला आहे व इतर देशांतूनही ही 'शेती' सुरू झाली आहे. समुद्रकिनारी बांध घालून कालवं वाढतील अशी परिस्थिती निर्माण केली जाते.


या अडवलेल्या पाण्यात कालवांची पिले सोडली जातात. ती मोठी झाली की त्यांच्या शिंपल्यांत मुद्दामच कण सोडले जातात. हे कण कालवाच्या शरीरास त्रास देऊ लागले की त्याभोवती कालव मोती बांधते. हे मोती खऱ्या मोत्यांपेक्षा कुठल्याही बाबतीत कमी नसतात; मात्र त्यांची किंमत खूपच कमी असते.

### उपदेश

एका घोड्याला आपल्याच छायेला बुजण्याची खोड होती. ही खोड जावी म्हणून त्याच्या स्वाराने पुष्कळ प्रयत्न केले व शेवटी त्यास काटेरी लगामही घालून पाहिला; परंतु ती त्याची खोड जाईना. तेव्हा तो त्या घोड्यास म्हणाला, 'मूर्खा, छाया म्हणजे तुझीच सावली. तुझ्या शरीरांतून उजेड पार जात नाही म्हणून छाया पडते. छायेला दात नाहीत, पंजे नाहीत व तुझ्या चालण्याच्या आडही ती येऊ शकत नाही, तर मग तू तिला भितोस काय म्हणून ?

घोड्याने उत्तर दिले, 'धनीसाहेब कोणी मोठा शत्रू झाला तरी त्याला कशा ना कशाची तरी भीती वाटते. तुम्ही मनुष्ये स्वप्नात भितात किंवा अंधारांत एखाद्या लाकडाच्या ओंडक्याला पाहून घाबरतात ते काय म्हणून ? तेथे तरी तुमच्या कल्पनेशिवाय तुम्हांला घाबरविणारे दुसरे कोण असते बरे?

तात्पर्य : वरील कथेतून हा बोध होतो की आपल्या स्वत:च्या उणीवांकडे दुर्लक्ष करुन दुसऱ्यांना उपदेश देवू नये.



## रहमते दर्शन (भाग - १)

इसके पश्चात भी कई बार मेरा गला खराब हुआ। मैंने वे गोलियाँ ली भी परन्तु कोई आराम नहीं आया। यह महाराज जी की अपार दया-मेहर और बख़्शिश ही थी जो वे मुझसे काम लेना चाहते थे। गोलियों का तो केवल एक बहाना ही था। उस रात क़व्वाली का प्रोग्राम महाराज की हाज़िरी में ही हुआ । महाराज जी ने वह क़व्वाली दो बार सुनी और प्रोग्राम के पश्चात हमें माता जी और महाराज जी ने अन्दर बुलाकर बहुत सा प्यार दिया। महाराज जी से आशीर्वाद पाकर जब हम बाहर निकले तो यही समझते रहे कि यह कोई स्वप्न है । इतना प्यार पाने के पश्चात हम अगले कार्यक्रम की तैयारी में जुट गये। अगले Function पर जो ६ फ़रवरी को था, महाराज जी ने हमसे क़व्वाली सुनी और पूरा सत्संग उस ग़ज़ल पर ही फ़रमाया । सत्संग ख़त्म होने के पश्चात महाराज जी ने बड़े प्यार से मुझे देखा और बोले, बेटा, तुमने मेरे दिल के तारों को छेड़ दिया है। उन्होंने आदेश दिया, जो तुम सुना रहे थे, उसे श्री हरिश्चंद चड्ढा जी ('सत् - संदेश' पत्रिका के संपादक) को सुनाओ और इसका मतलब पता करो। अर्थ समझ आ जाने पर तुम्हें गाने में कुछ और ही आनंद आयेगा। मुझे संगीत की क, ख, ग भी नहीं आती थी परन्तु महाराज जी की दया - मेहर से आज हम अच्छा गा लेते हैं और उसे सभी पसन्द भी करते हैं।

### वे बारिशे रहमत थे

यह सब उस दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज की दया नहीं तो और क्या है? महाराज संत राजिन्दर सिंह जी के चोले मैं बैठकर अब भी महाराज जी ने वह सेवा हमें बख़्श रखी है।

### वे बडे रहम दिल थे

संत दर्शनसिंह जी महाराज रब्बी हस्ती थे। वो प्यार के सौमे थे। प्यार उनसे फूट-फूटकर निकलता था। उनसे मिलकर दिल यही चाहता था कि पास बैठा रहूँ। उनसे बातें करता रहूँ और यह हालत उस वक़्त थी, जबकी मैंने १९५५ में हुज़ूरे पुरनूर संत कृपालसिंह जी महाराज से नामदान प्राप्त किया था। चंद दिनों बाद ही उनसे (संत दर्शनसिंह जी से) मुलाक़ात हो गई। उनसे पहली मुलाकात में ही नजदीकी हासिल हो गई। ये उनकी बख़्शिश थी । लगभग १९८० में एक दफ़ा बातों-बातों में मैंने ज़िक्र कर दिया कि मैं भी १९३७ में सेंट्रल मॉडल स्कूल, लाहौर में पढ़ा करता था, क्योंकि वे भी उसी स्कूल में उन दिनों पढ़ते थे और मुझसे एक साल सीनियर थे। ये जानकर वे बड़े खुश हुए और ये शे'र पढ़ा :

ये निशफ शदी का मेला है,
दो चार दिनों की बात नहीं।

वक़्त गुज़रता गया और संत दर्शनसिंह जी महाराज से प्यार बढ़ता गया। उनकी सेवा करने का मौका आमतौर पर मिल जाता था। वे बड़े नम्र स्वभाव वाले, खुश मिजाज़, मिलनसार, रहमदिल और दयालु थे। उनके प्यार की कशिश मुझे उनकी तरफ़ खेंचती चली गई। १९ अगस्त १९७४ रात १२ बजे के बाद, मैं हुज़ूरे पुरनूर संत कृपालसिंह जी महाराज की सेवा में था, उस वक़्त हुज़ूरे पुरनूर काफ़ी जिस्मानी

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

२३वां गुण सूत्र वह है जिस से ऐसी तरंगे निकलती हैं जो विपरीत लिंग को आकर्षित करती हैं। बहिनों को यह गुण सूत्र माता से मिलता है। इस गुण सूत्र में चुम्बकीय तरंगे होती हैं जो वातावरण में प्रवाहित होती रहती हैं और भाइयों को अपनी तरफ आकर्षित करती हैं। बहिनों से निकलने वाली इन तरंगो को ऋणात्मक चुम्बकीय तरंगे कहते हैं। ऐसे ही भाइयों की सफेद कोशिकाओं में २३वें गुणसूत्र से ऐसी तरंगे निकलती हैं जो स्त्रीलिंग को आकर्षित करती हैं। भाइयों को यह गुण सूत्र बाप से मिलता है। इस गुण सूत्र में चुम्बकीय तरंगे होती हैं। जो वातावरण में प्रवाहित होती रहती हैं और बहिनों को अपनी तरफ आकर्षित करती रहती हैं।

उतरी और दक्षिणी ध्रुव

धरती की चुम्बकीय शक्ति प्रत्येक जीव और निर्जीव पर प्रभाव डालती है। यह चुम्बकीय शक्ति किसी भी चीज को पृथ्वी की परिधि से बाहर नहीं जाने देती।

बहिनों को दक्षिणी ध्रुव माना गया है। बहिनों से हर पल ऋणात्मक ऊर्जा निकलती रहती है जो भाइयों को अपनी तरफ आकर्षित करती है। भाइयों को उतरी ध्रुव माना गया है और प्रत्येक भाई से हर पल धनात्मक ऊर्जा वातावरण में प्रवाहित होती रहती है और बहिनों को आकर्षित करती रहती है।

### मूल आधार चक्र

भाइयों और बहिनों से निकलने वाली ये तरंगे वास्तव में प्यार है। ये प्यार पुरुष और स्त्रियों के लिए आक्सीजन का कार्य करता है। अगर बहिने न हों तो भाई तड़फ तड़फ कर मर जायेंगे और अगर भाई न हो तो बहिने घुट कर दम तोड़ देंगी। जब किसी को विपरीत लिंग से प्यार नहीं मिलता है तो ये प्यार वासना में बदल जाता है।

इस घोर कलयुग में प्रत्येक मनुष्य में प्यार खत्म हो गया है। इसलिए हरेक मनुष्य में काम विकार ने आतंक मचा रखा है। विश्व का प्रत्येक बूढ़ा बच्चा और जवान काम विकार से जल रहा है। असंभव पवित्रता पालन करना सब से असंभव माना गया है। ऋषि मुनि साधू संत सभी इस में फेल हो जाते हैं। अपवित्रता के कारण विद्यार्थी पढ़ाई में फ `ल हो जाते हैं। योगी योग पथ से भटक जाता है। संसारिक व्यक्ति अपना परिवार नष्ट कर लेता है। राजयोगी भी पथ भ्रष्ट हो जाते हैं। काम विकार का कर्म करने या कामुक चिंतन से दिमाग का वह केंद्र कमजोर हो जाता जिस से योग लगाते हैं। भगवान सम्पूर्णता और कुछ नहीं सम्पूर्ण ब्रह्मचर्य है। चाहे कुछ भी हो जाये विपरीत लिंग की तरफ थोडा सा भी विकारी संकल्प न जाए। यह काम विकार सिर्फ और सिर्फ भगवान की याद से समूल नष्ट होता है। यही भगवान की निशानी है। अगर आप इस विकार से परेशान हैं तो समझो आप के योग में कमी है। अगर हम ३ घंटे हर रोज बैठ कर साधना करते हैं तो काम विकार तंग नहीं करेगा। परन्तु सारा संसार भगवान को याद नहीं करेगा। इसलिए इस विकार से सभी परेशान हैं।

काम विकार को कैसे जीतें

काम विकार को प्रत्येक व्यक्ति जीत सकता है। इस के लिए कुछ सुझाव दे रहा हूं। इस भटकाव से बचने के लिये मन में जिस लिंग के आप हैं उसे ही देखते रहें। आप बहिन हैं तो किसी बहिन को और शिव बाबा या इष्ट को मन में देखते रहे अगर आप भाई हैं तो हर पल किसी भाई या इष्ट को मन में देखते रहें और इष्ट को कहते रहें आप शांति के सागर हैं। आप को अपवित्र संकल्प तंग नहीं करेगें।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदीय बालसंस्कार

सात दिवस त्या रुग्णास योग बस्तीक्रम दिला व रोज संध्याकाळी शिरोधारा केले. शिरोधारासाठी जटामांसी + ब्राह्मी + आवळा + शंखपुष्पी + नागरमोथा या औषधीयुक्त तेलाचा वापर केला. तीन वर्षांपासून झोप न आलेली ही स्त्रीरुग्ण शिरोधारा चालू असतानाच डुलकी घेऊ लागली. पाचव्या दिवशी तर घोरण्याचा आवाज येऊ लागला. बस्ती चिकित्सेमध्ये वातनाशक वनस्पती द्रव्यांच्या काढ्याची बस्ती एक दिवस; तर दुसऱ्या दिवशी तेलाची बस्ती असे सलग सात दिवस उपचार केल्याने वातप्रकोप कमी झाला. रोज चर्चा करून तिला बोलते ठेवण्याचा प्रयत्न केला. सहाव्या दिवशी ती जोरजोरात धाय मोकलून रडू लागली. त्यामुळे तिच्या भावनांचा निचरा झाला व साहजिकच तिची नैराश्यावस्था कमी झाली. अभ्यंतर चिकित्सेमध्ये तिला टॅबलेट सुमेन्टा व सायरप मेधाविनी चालू केले. या उपचारांनी नैराश्यावस्था कमी होऊन हळूहळू तिला रात्रीही झोप येऊ लागली. पंधरा दिवसानंतर त्यांना तपासणीस बोलावले.

### अपुऱ्या दिवसांचे व कमी वजनाचे बाळ

हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करेपर्यंत शरीरात फक्त ४० टक्के रक्त राहिले होते. रक्ताच्या तीन पिशव्या भरल्या, तरीही व औषधोपचार करुनही रक्तस्त्राव थांबत नसल्यामुळे मला वाचविण्यासाठी सीझेरियन करण्याचा निर्णय डॉक्टरांनी घेतला. बाळ वाचण्याची शक्यता सांगितलीच नव्हती. सीझेरियन झाल्यानंतर बाळाचे वजन फक्त १,२०० ग्रॅम एवढे भरले. अपुऱ्या दिवसांमुळे बाळाला श्वासोच्छ्वास घेण्यास त्रास होत होता म्हणून बाळाला-दुर्वाला- कृत्रिम (Ventilater) श्वासोच्छ्वासावर ठेवण्याची गरज लागू शकत होती, म्हणून तिला पुण्यातील एका हॉस्पिटलमध्ये तत्काळ नगरहून न्यावे लागले.

भूल उतरल्यानंतर जेव्हा मला हे समजले, त्या वेळी मनावर खूप मोठा आघात झाला. सत्य स्वीकारण्याची मनाची तयारी होत नव्हती. माझ्याकडे येणाऱ्या प्रत्येक गर्भवतीचे बाळ प्रसूतीच्या वेळेस तीन ते साडेतीन किलोपर्यंत असते. अनेकजणींची नैसर्गिक सुलभ प्रसूती होते; आणि आज माझ्यावरच अशी वेळ आली, याबद्दल खूप वाईट वाटत होते. आज मी व माझे पती दोघेही वैद्यकीय क्षेत्रातील असल्यामुळे व त्यातील ज्ञानामुळे आम्ही दुर्वाला वाचवू शकलो. तिला वाचविण्यासाठी मला खूप जिद्द, चिकाटी व कठोर परिश्रम घ्यावे लागले. जन्माला आल्यानंतर दुर्वाला स्तनपान घेता येत नव्हते. तिचा जन्म तीस आठवड्यांमध्येच झाल्यामुळे तिला दूध पिणे व गिळणे या प्रक्रिया जमत नसल्याने नाकातून नळी टाकून (Feeding Tube) तीन आठवडे दूध देण्याची प्रक्रिया सुरू होती. बाहेरचे दूध पचत नसल्याने मला अंगावरचे दूध काढून तिला नळीतून द्यावे लागत असे. या काळात मी स्वतः खूप अशक्त झाले होते. माझे शारीरिक, मानसिक व भावनिक खच्चीकरण झाले होते. रात्रीचे जागरण करून खूप थकवाही जाणवत होता. एवढे करून बाळ जगण्याची शाश्वती कमी होती, त्यामुळे सारखे असुरक्षित वाटत होते. आतापर्यंतच्या जीवनामधील सर्वांत अवघड व कठीण परीक्षा चालली आहे, असे वाटत होते. पहिलेच बाळंतपण असल्यामुळे मलाही यातील अनुभव नव्हता. डॉक्टर या नात्याने मी रुग्णांना सल्ला व मानसिक आधार देत असते, पण स्वत:वरच वेळ आल्यावर काय करावे, काही समजत नव्हते. अशा वेळी अनेकजण आपल्याला सल्ले देत असतात.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# भिंगार अर्बन को ऑपरेटिव्ह बँकेला ६ कोटी ८७ लाखांचा 'ढोबळ नफा'



अनिलराव झोडगे | किसनराव चौधरी

नगर – भिंगार अर्बन बँकेला मार्च २०२५ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात रु.६ कोटी ८७ लाखांचा ढोबळ नफा झाला असून आयकर व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे मार्गदर्शक सुचनांनुसार आवश्यक त्या तरतुदी करुन निव्वळ नफा रु. ३ कोटी ९७ लाखांचा झालेला आहे. मार्च २०२५ अखेर ठेवींमध्ये मागील वर्षापेक्षा ३३.९४ कोटीने वाढ होऊन एकुण ठेवी ३४०.२६ कोटी, कर्जामध्ये ३३.०९ कोटीने वाढ होऊन, चालुवर्षी एकूण कर्जे २३४.३५ कोटी, व व्यवसायामध्ये ६७.०३ कोटीने वाढ होऊन चालुवर्षी एकूण व्यवसाय ५७४.५७ कोटी झालेला आहे. निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण ०% राखण्यात यश मिळविले आहे. बँकेने सभासदांना सातत्याने १५% लाभांश दिलेला असून चालू वर्षीही १५% लाभांश वितरीत करण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे, असल्याचे प्रतिपादन बँकचे चेअरमन अनिलराव झोडगे यांनी सांगिले.

पुढे बोलताना अनिलराव झोडगे म्हणाले की, सभासदांचा, खातेदारांचा बँकेवरील विश्वास बँकेचे कर्मचारी, संचालक मंडळाचे विश्वासपूर्ण काम यामुळेच बँक सातत्याने प्रगती करीत आहे. भविष्यात अधिकाधिक ग्राहकाभिमुख सेवा देण्याचे अनुषंगाने ग्राहकांना मोबाईल बँकीग सुविधा यु.पी.आय. सुविधेसह (गुगल–पे, फोन–पे, क्यु–आर कोड सह) ११ एप्रिल रोजी थोर समाजसुधारक महात्मा ज्योतीबा फुले यांच्या १९८ व्या जयंतीच्या मुहुर्तावर ग्राहकांसाठी सुरु करणार आहोत. बँकेला अहवाल सालात बॅकोतर्फे ३०० ते ३५० कोटी वर्गवारित प्रथम क्रमांकाचा ब्ल्यु रिबन पुरस्कार ॲम्बेव्हॅली (लोणावळा) येथे प्रदान करण्यांत आला.

व्हा.चेअरमन किसनराव चौधरी म्हणाले की, बँकिंग बरोबर सभासदांचे गुणवंत विदयार्थ्यांना प्रोत्साहन देणे, सामाजीक उपक्रम राबविणे, कर्मचारी प्रशिक्षणाव्दारे अधिकाधिक उत्कृष्ट ग्राहक सेवेव्दारे बँकेचा नावलौकिक वाढून बँकेची सर्वांगीण प्रगती होत आहे, असे ते म्हणाले.

प्रास्ताविक मुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत महाजन यांनी केले. यावेळी त्यांनी बँकेच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.

यावेळी संचालक मंडळ राजेंद्र पतके, कैलासराव खरपुडे, विष्णु फुलसौंदर, महेश झोडगे, माधव गोंधळे, रुपेश भंडारी, कैलास रासकर, कैलास दळवी, एकनाथराव जाधव, नामदेवराव लंगोटे, श्रीमती तिलोत्तमा करांडे, सौ. अनिता भुजबळ, तज्ञसंचालक रामसुख मंत्री, सीए राजेंद्र बोरा आदी उपस्थित होते.



सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्यावतीने नवकार कलश रॅलीचे स्वागत करण्यात आले.

# सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्यावतीने नवकार कलश रॅलीचे स्वागत

### विश्व नवकार मंत्र दिन कार्यक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे : अभय पितळे

नगर – विश्व नवकार मंत्र दिनानिमित्त जितो अहिल्यानगरच्यावतीने नगर शहरातून नवकार कलश रॅली काढण्यात आली. या रॅलीचे चौकाचौकात उत्साहात स्वागत करण्यात आले. सहकारमहर्षी सुवालाल गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्यावतीनेही या रॅलीचे पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. यावेळी चेअरमन समीर बोरा, व्हाईस चेअरमन अभय पितळे, संचालक संतोष गांधी, चेतन भंडारी, व्यवस्थापक प्रशांत भंडारी, उपव्यवस्थापक नयना बोगावत आदींसह सभासद उपस्थित होते.

अभय पितळे म्हणाले, विश्व नवकार मंत्र दिन हा ऐतिहासिक दिन ठरणार आहे. ९ एप्रिल रोजी धार्मिक परीक्षा बोर्ड येथे सकाळी ७ वाजता भव्य सामूहिक नवकार जाप कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. संपूर्ण देशभरात भाविक नवकार जाप करणार आहेत. या सोहळ्यात प्रत्येक नगरकराने सहभागी होवून नवकार जापाची सकारात्मक अनुभूती मिळवावी.

धार्मिक परीक्षा बोर्ड येथे यानिमित्त पवन नाईक, भूषण मालू व नगरच्या कलाकारांनी तयार केलेली नवकार नाद धून सादर करण्यात येणार आहे. याशिवाय विविध सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. कार्यक्रमाची जय्यत तयारी करण्यात आली असून भव्य मंडप उभारण्यात आला आहे. तसेच खुर्च्यांची व्यवस्था असून जागोजागी एलईडी स्क्रिनची व्यवस्था करण्यात आली आहे. अतिशय पवित्र पावन वातावरणात मंगलकारी नवकारी मंत्राची जादू प्रत्येकाला अनुभवता येणार आहे. देशभरात एकाच वेळी विविध ठिकाणी हा कार्यक्रम होणार आहे. त्याचे थेट प्रक्षेपणही केले जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक बडे उद्योजक, दिग्गज सेलिब्रेटी यात सहभागी होऊन संबोधित करणार आहेत. नगरमधील या कार्यक्रमात सर्व भाविकांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# छावनी परिषद शाळेचे प्रसाद शेलार व आयुष घोरपडे लक्ष्यवेध प्रज्ञाशोध परीक्षेच्या जिल्हा गुणवत्ता यादीत





नगर – छावनी परिषदेच्या पीएमश्री डॉ.बाबासाहेब आंबेडकर शाळेतील इयत्ता ५ वीच्या प्रसाद अशोक शेलार याने २३६ गुण मिळवत जिल्हा गुणवत्ता यादीत १६ व राज्य यादीत २१ वा तसेच इयत्ता ६ वीच्या आयुष धनंजय घोरपडे यांने २४४ गुण मिळवत लक्ष्यवेध प्रज्ञा शोध परिक्षेच्या जिल्हा गुणवत्ता यादीत २१ वा व राज्य यादीत २६ वा क्रमांक प्राप्त केले आहे.

लक्ष्यवेध प्रज्ञाशोधच्या गुणवत्ता यादीतील यशस्वी विद्यार्थ्यांना सुभाष भारूड व सीमा चोभे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे, छावनी परिषदेचे मनोनीत सदस्य वसंत राठोड, शाळा व्यवस्थापनचे अध्यक्ष जयदेव हेंद्रे, मुख्याध्यापक संजय शिंदे आदींनी अभिनंदन केले आहे.

# भिंगारच्या नवीन मराठी शाळेचे 'लक्ष्यवेध प्रज्ञाशोध परीक्षेत' यश

नगर – लक्ष्यवेध प्रज्ञाशोध परीक्षा मंडळा मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये अ.ए.सो.च्या नवीन मराठी शाळा, भिंगार अहिल्यानगर येथील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश प्राप्त केले आहे. यामध्ये इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेमध्ये सहभाग घेतला होता. त्यामध्ये पुढील प्रमाणे यश संपादन केले आहे. इयत्ता १ ली मधील राज्यस्तरीय ९ विद्यार्थी, इयत्ता २ री मधील राज्यस्तरीय ६ विद्यार्थी, इयत्ता ३ री मधील राज्यस्तरीय १२ विद्यार्थी, इयत्ता ४ थी मधील राज्यस्तरीय १ विद्यार्थी

मुख्याध्यापिका सौ. गांगर्डे विद्या, मार्गदर्शक शिक्षक खेले शामकुमार, सौ. भांगरे विद्या, श्रीमती मनीषा कांबळे, श्रीमती जरे रेखा, श्रीमती पाटोळे आरती, श्रीमती वाघ सारिका या सर्व मार्गदर्शक शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे श्रीमती छायाताई फिरोदिया, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, शाळा समितीचे चेअरमन रवींद्र बाकलीवाल व शाळा समिती सदस्य यांनी अभिनंदन केले.

# भगवान महावीर कल्याणकनिमित्त महावीरनगर येथे ९ एप्रिल रोजी भक्तीसंध्या

### १० एप्रिल रोजी मिरवणुकीचे आयोजन



सागरभाई शहा

नगर – नगरमध्ये भगवान महावीर जन्म कल्याणक दिनाची तयारी सुरु झाली आहे. सावेडी महावीरनगर येथील अरिहंत युवक मंडळातर्फेही भगवान महावीर जन्मकल्याणक साजरे केले जाणार आहे. यानिमित्त ९ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता गणपती मंदिराच्या प्रांगणात सागरभाई शहा मुरबाडवाला यांची भक्ती संध्या जैन लाईव्ह कॉन्सर्ट आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती सचिन कटारिया व अभिजीत गुगळे यांनी दिली.

स्वप्नील गांधी, परेश मुथियान, मनोज भटेवरा यांनी सांगितले की, भगवान महावीर जन्मकल्याणकनिमित्त भाविकांना भक्तीगीतांची मेजवानी देण्यासाठी सागरभाई शहा यांना खास निमंत्रित करण्यात आले आहे. देशभरात त्यांच्या भक्तीगीतांचे कार्यक्रम होत असतात. गीतसंगीतातून भगवंतांशी जोडणारी ही भक्तीसंध्या सर्व भाविकांसाठी पर्वणी ठरणार आहे. सावेडी, महावीरनगर, नागापूर, हडको आदी परिसरातील भाविक या कार्यक्रमांत सहभागी होणार आहेत.

मंडळातर्फे १० एप्रिल रोजी भगवान महावीर जन्मकल्याणक मिरवणूकही काढण्यात येणार आहे. यादिवशी सायंकाळी ४ वाजता महावीरनगर जैन स्थानकापासून मिरवणुकीस प्रारंभ होवून सायंकाळी ६.३० वाजता मिरवणूक हडको जैन धर्म स्थानकाजवळ येईल. या मिरवणुकीत भाविकांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून सहभागी व्हायचे आहे. भगवान महावीर स्वामी यांचे जीवन संदेश याव्दारे सादर करण्यात येणार आहेत. या सर्व कार्यक्रमांत भाविकांनी सहकुटुंब सहभागी होण्याचे आवाहन मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

# पारनेर जैन महासंघातर्फे १० एप्रिल रोजी भगवान महावीर स्वामी जन्म कल्याण महोत्सवाचे आयोजन

नगर – पारनेर तालुका जैन महासंघाच्या संकल्पनेतून गेल्या २४ वर्षांपासून विविध गावांमध्ये भगवान महावीर स्वामी जयंती उत्साहात साजरी करण्यात येते. या वर्षी २४ व्या तीर्थंकर भगवान महावीर स्वामी यांच्या जन्म कल्याण महोत्सवाचे आयोजन १० एप्रिल रोजी खडकवाडी गावात करण्यात आले आहे. महोत्सवाची सुरुवात सकाळी ८:३० वाजता शोभायात्रेने होणार आहे. त्यानंतर मुख्य कार्यक्रमाला सुरुवात होईल.

या कार्यक्रमातून जैन समाजाच्या परंपरा आणि संस्कृतीचे दर्शन घडविण्यासोबतच सामाजिक एकता आणि बंधुभावाचे प्रतीक म्हणून हा उत्सव साजरा होणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन माजी सरपंच प्रवीण भन्साळी, चार्टर्ड अकाउंटंट विशाल राका आणि व्हा. चेअरमन संजय कर्नावट, सुमतीलाल राका, महासंघाचे उपाध्यक्ष प्रसाद कर्नावट यांनी महोत्सवात सहभागी होऊन भगवान महावीर स्वामींच्या विचारांचा प्रसार आणि प्रचार करण्याचे आवाहन केले आहे.

पुढील एक वर्षासाठी संघाच्या कार्याचा आराखडा अध्यक्ष राजेश भंडारी सादर करणार आहेत. यामध्ये सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रातील विविध उपक्रमांचा समावेश असेल. विशेषतः समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षणावर भर देणारे प्रकल्प, गरजूंना मदत करण्याचे उपक्रम आणि धार्मिक सहलींचे आयोजन यासारख्या महत्त्वाकांक्षी योजना या आराखड्यात असतील. याशिवाय, जैन धर्माच्या मूल्यांचा प्रसार आणि तरुण पिढीला या संस्कृतीशी जोडण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार असल्याचेही त्यांनी नमुद केले. शोभायात्रेपासून सुरू होणारा हा कार्यक्रम दिवसभर चालणार असून, समाजबांधवांनी आणि स्थानिक नागरिकांनी यात उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# तुकाराम महाराजांच्या अभंगांनी ईश्वर भक्ती व आत्मचिंतनाची ज्योत पेटवली

### हभप रत्नाताई सुतार महाराज यांचे प्रतिपादन; नालेगाव गाडगीळ पटांगण येथे हनुमान व्यायाम शाळा यांच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताह



नालेगाव गाडगीळ पटांगण येथे हनुमान व्यायाम शाळा यांच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताहमध्ये हभप रत्नाताई सुतार महाराज यांची कीर्तन सेवा झाली. (छाया – लहू दळवी)

नगर – अडाणी समाजाला ज्ञानाकडे घेऊन जाण्याचे काम संतांनी केले आहे. त्यांचे विचार समाजाला प्रेरणादायी आहे, आपण ज्या वेळेस संकटात असतो त्यावेळेस देवाची आठवण होत असते, हे न करता आपल्या आचरणातून देवाची भक्ती दिसू द्या संत तुकाराम महाराज हे महाराष्ट्राच्या भक्ती चळवळीतील एक तेजस्वी सूर्य होते. वारकरी संप्रदायाचे महान संत आणि समाजसुधारक म्हणून त्यांनी जे कार्य केले, ते आजही प्रेरणादायक ठरत आहे. त्यांचा जीवनप्रवास म्हणजे आध्यात्मिक शुद्धतेचा, समाजसेवेचा आणि सत्यवादित्वाचा एक आदर्श मार्ग आहे. तुकाराम महाराजांनी त्यांच्या अभंग वाणीच्या माध्यमातून समाजाला नवा दृष्टिकोन दिला. त्यांच्या अभंगांनी सामान्य जनतेच्या मनात ईश्वरभक्तीची आणि आत्मचिंतनाची ज्योत पेटवली. त्यांचे शब्द म्हणजे थेट हृदयाशी संवाद करणारे आणि प्रत्येक माणसाच्या अंतरात्म्याला स्पर्श करणारे होते. त्या वेळच्या समाजात असलेली जात–पात, अंधश्रद्धा, आणि भेदभाव या गोष्टींविरोधात त्यांनी आवाज उठवला. सर्व धर्म, सर्व जाती समान हा त्यांचा संदेश एक प्रकारे राष्ट्रीय एकात्मतेचा पाया होता. आजच्या भारताच्या सामाजिक समरसतेच्या संकल्पनेला त्यांच्या विचारांनी मोठा आधार दिला आहे. संत तुकारामांनी केवळ अध्यात्मच नव्हे तर सामाजिक आणि मानसिक स्वातंत्र्य दिलं. त्यांनी आपल्या कीर्तनांद्वारे लोकांना विचार करण्याची, चूक ओळखण्याची आणि सन्मार्ग स्वीकारण्याची प्रेरणा दिली असल्याची प्रतिपादन हभप रत्नाताई सुतार महाराज यांनी केले.

नालेगाव गाडगीळ पटांगण येथे हनुमान व्यायाम शाळा यांच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताह मध्ये हभप रत्नाताई सुतार महाराज यांची कीर्तन सेवा झाली. यावेळी माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल सुनीता मुदगल आदीसह नागरिक उपस्थित होते.

धार्मिक कार्यक्रमातून समाज एकवटला जात असतो, त्यातून बंधुभाव निर्माण होत असतो. अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून नालेगाव गाडगीळ पटांगण येथे अध्यात्मिकतेचे केंद्र बनले असून नागरिक धार्मिक कार्यक्रमाचा आनंद घेत आहे. पावन हनुमान मंदिर हे बालकांचे श्रद्धास्थान असून त्या ठिकाणी वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होत असल्याची माहिती दत्तात्रय मुदगल यांनी दिली.

# राज्य पुरस्कार प्राप्त हिंदी नाटक 'अम्मो'चा खास नगरकारांसाठी १० एप्रिल रोजी प्रयोग

नगर – ६३ व्या हिंदी राज्यनाट्य स्पर्धेत अंतिम फेरीत दुसऱ्या क्रमांकाने विजेते नाटक, तसेच दिग्दर्शन आणि अभिनयाची अनेक पारितोषिके मिळवणारे शैलेश देशमुख दिग्दर्शित व होप फाउंडेशन प्रस्तूत, डिज् मिडिया निर्मित दोन अंकी हिंदी नाटक अम्मो चा नाट्यप्रयोग १० एप्रिल रोजी माउली सभागृह येथे संध्याकाळी ७ वाजता आयोजित केला आहे.

एका स्त्री ने जर मनात ठरवले तर तिच्यासाठी कोणतीही गोष्ट अशक्य नाही हे सांगणारे सत्यकथेवर आधारित नाटक आहे. सदर नाटकाचे मुळ लेखक अरविंद लिमये असून त्याचा हिंदी अनुवाद अनुवाद श्रीनिवास नार्वेकर यांनी केला आहे. ६३व्या महाराष्ट्र राज्य हिंदी नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत ह्या नाटकास सांघिक दुसऱ्या क्रमांकासह सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन द्वितीय क्रमांक, सर्वोत्कृष्ट स्त्री अभिनय रौप्य पदक, सर्वोत्कृष्ट अभिनय प्रमाणपत्र हे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. वैशाली गोस्वामी, पल्लवी दिवटे, श्लोक देशमुख, देवीप्रसाद सोहोनी, महिर कुलकर्णी, शर्वरी अवचट, अजय लाटे, मनुजा देशमुख, पूजा जगदाळे, सागर अलचेट्टी, अविष्कार ठाकूर, पुरुषोत्तम उपाध्ये, हर्षदा वाघमारे, मोनीश ढाळे, अमोल तोडकर या नगरच्या कलाकारांनी यात अभिनय केला असून प्रकाश योजना गणेश लिमकर, नेपथ्य नानाभाऊ मोरे, संगीत संयोजन शैलेश देशमुख, रंगभूषा चंद्रकांत सैंदाणे, वेशभूषा शितल देशमुख, रंगमंच व्यवस्था शुभम घोडके, करण खेडकर आदी. बघणार असून सूत्रधार प्रसाद भणगे आहेत.

नाटकाच्या प्रवेशिकांसाठी ९२२५३१६६१५ किंवा ९६०४९०१७९५ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन संघातर्फे करण्यात आले आहे.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाचे ८ ते १४ एप्रिल दरम्यान आयोजन

नगर – सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त ८ ते १४ एप्रिल या कालावधीत 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता सप्ताहाचे ८ एप्रिल रोजी उद्‌घाटन करण्यात येणार असून १४ एप्रिलपर्यंत भारतीय संविधानाची उद्देशिका, प्रस्ताविका यांचे नियमित वाचन करणे व जनजागृती करणे आदी कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. या सप्ताहात ९ एप्रिल रोजी जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालय, शासकीय वसतिगृहे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारांवर आधारीत वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, लघुनाट्य स्पर्धा इत्यादीचे आयोजन तसेच योजनाच्या लाभाचे प्रातिनिधिक स्वरूपात लाभार्थ्यांना वाटप करणे आदी उपक्रम राबविण्यात येतील.

समतादूतामार्फत ग्रामीण व शहरी भागात १० एप्रिल रोजी पथनाट्य व लघुनाटिका याद्वारे विविध योजनाबाबत जनतेचे प्रबोधन करण्यासोबतच मार्जिन मनी योजनेतंर्गत कार्यशाळा राबविण्यात येणार आहे.

११ एप्रिल रोजी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात येईल आणि व्याख्यानाचे आयोजन करण्यात येईल.

१२ एप्रिल रोजी भारतीय संविधानाविषयी माहिती देणारा संविधान जागर कार्यक्रम व महिला मेळाव्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेल्या कार्याबद्दल माहिती देणारे व्याख्यान आयोजित केले जाणार आहे.

ज्येष्ठ नागरिकांसाठी १३ एप्रिल रोजी जनजागृती शिबीर व नागरिकांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात येईल. जिल्ह्यातील आरोग्य अधिकाऱ्यांच्या सहकाऱ्याने सर्व महाविद्यालय, आश्रमशाळा, शासकीय वसतिगृह येथे रक्तदान शिबीर तसेच सर्व शासकीय कार्यालयांमध्ये स्वयंसेवी संस्थांच्या सहाय्याने अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांमधून स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे.

सामाजिक समता सप्ताहाचा समारोप १४ एप्रिल रोजी होणार आहे. या दिवशी सामाजिक न्याय विभागांतर्गत अधिनस्त शासकीय कार्यालये, महाविद्यालय, आश्रम शाळा, येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून जयंती साजरी करणे, व्याख्याने, चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान मेळावा आयोजित करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्यांसाठी केलेल्या कार्याबद्दल माहिती सांगणारे व्याख्यान आयोजित केले जाणार आहे. या दिवशी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्यावतीने जात वैधता प्रमाणपत्रांचे ऑनलाईन वितरण केले जाणार आहे, अशी माहिती समाज कल्याण सहाय्यक आयुक्त प्रविण कोरगंटीवार यांनी दिली आहे.

# फिनिक्सच्यावतीने १० एप्रिल रोजी नागरदेवळे येथे मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

### महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा उपक्रम; नागरिकांना शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन


नगर – क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवानिमित्त नागरदेवळे (ता. नगर) येथे फिनिक्स सोशल फाउंडेशनच्यावतीने १० एप्रिल रोजी मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात गरजूंना सहभागी होण्याचे आवाहन फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी केले आहे.

नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिरात तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीमध्ये हे शिबिर होणार आहे. यामध्ये गरजू रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करून ज्या रुग्णांना मोतीबिंदू, काचबिंदूची गरज आहे, अशा रुग्णांना पुणे येथील के. के. आय बुधराणी हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे. तसेच रुग्णांना पुणे येथे जाणे, येणे, राहणे व जेवण्याची मोफत सुविधा केली जाणार आहे. तरी गरजू रुग्णांनी शिबिरात सहभागी होण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९८८१८१०३३३ या नंबरवर संपर्क साधण्याचे म्हटले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# घटस्फोटीत, परित्यक्ता या सवलतीखाली बदलीचा लाभ घेण्याकरिता अर्ज करणाऱ्या सर्व शिक्षकांची सत्यता तपासावी : चंद्रशेखर पंचमुख

### खोट्या शिक्षकांवर तात्काळ कारवाई करण्याची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाच्या वतीने निवेदनाद्वारे मागणी



नगर – घटस्फोटीत, परित्यक्ता या सवलती खाली संवर्ग एक मध्ये बदलीचा लाभ घेण्याकरिता अर्ज करणाऱ्या सर्व शिक्षकांची सत्यता तपासणी शिक्षकांची माहिती नोंद सेवा पुस्तकात घ्यावी व खोट्या शिक्षकांवरती कारवाई करण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाच्या वतीने प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांना निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सामाजिक न्याय विभाग तालुका अध्यक्ष चंद्रशेखर रावसाहेब पंचमुख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हंटले आहे की, अहिल्यानगर जिल्ह्यात अनेक महिला शिक्षकांनी संवर्ग एक मध्ये घटस्फोटीत व परित्यक्ता या सवलतीचा लाभ मिळावा म्हणून त्यांनी फक्त नोटीसच्या आधारे बदलीमध्ये लाभ घेण्याकरिता खोट्या नोटरी करून प्रतिज्ञापत्र दिलेले आहे. फक्त नोटरीच्या आधारे बदलीचा लाभ यापूर्वी घेतला असून आत्ताही अशाच प्रकारचा लाभ घेण्याचा प्रयत्न करत आहे. बदली करिता सोपा पर्याय म्हणून हा मार्ग सर्वच निवडला जातो तसेच आता होणाऱ्या बदल्या करिता मोठ्या प्रमाणात असे अनेक शिक्षकांनी नोटरी करून दिल्या आहेत. या सर्वांची चौकशी करणे गरजेचे आहे. या सर्वांनी फक्त बदली लाभा करिता घटस्फोटीत व परित्यक्ता असल्याचे वकीलमार्फत पैसे देऊन खोटी माहिती पुरून नोटरी केली आहे. घटस्फोटीत व परित्यक्ता म्हणून बदलीसाठी लाभ घेण्याचा अनेक शिक्षिका बदलीसाठी असा वापर करतात परंतु ज्या घटस्फोटीत आहेत व पतीने सोडून दिले असे दाखवतात प्रत्यक्ष त्याच शिक्षिका पतीबरोबर राहतात पैशाचा आर्थिक व्यवहार होतो. पती–पत्नीला सोडायला व घ्यायला येतो दोघेही सोबत राहतात. याचे बँकेचे खातेही पतीच्या नावानेच आहेत. अशा सर्व घटस्फोटीत व परित्यक्तांची कसून चौकशी व्हावी, त्यांची शहानिशा व्हावी या शिक्षिका अशा प्रकारे धाकदपटशाने हक्क दाखवून लाभ घेतात तर निश्चित यामागे अधिकारी वर्गाचा त्यांना आशीर्वाद आहे. जर अशा प्रकारे फक्त नोटरीवरून बदल्या होऊ लागल्या तर संवर्ग एक मधील मोडणाऱ्या खऱ्यांवर अन्याय होत आहे. या महिला शिक्षिका शासनाची फसवणूक करतात याकरिता या सर्वांची निःपक्षपातीपणे चौकशी करून कागदपत्र पाहून दोषीवर तात्काळ गुन्हे दाखल करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा होण्यासाठी मुस्लिम समाजाची मशिदीत प्रार्थना



नगर – माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, यासाठी शहरातील मुस्लिम समाजाच्या वतीने ८ एप्रिल रोजी मशिदीत अल्लाहकडे प्रार्थना करण्यात आली. सध्या पुण्यातील एका खासगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार घेत आहेत. मंगळवारी मशिदीत विशेष प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी हाजी मन्सूर शेख, अख्तर सय्यद, मुन्ना चमडेवाले, आदनान शेख, जुनैद शेख, अखलाक शेख, हाजी नजीर, अजीज मोटर्सचे अज्जू भाई, मतीन शेख, अबरार पठाण, मुन्तझिम पठाण, अन्सार पठाण, रशिद पठाण, असद पठाण, समीर शेख, शाकीर शेख, सिद्दीक तांबोळी, नासीर पठाण, तबरेज शेख, रमीज शेख, मोहसीन शेख, फय्याज शेख, इकराम तांबटकर, फिरोज पठाण, सय्यद नाझ, अन्सार सय्यद आदी उपस्थित होते.





माजी आ. अरुण जगताप यांना उत्तम आरोग्य लाभो व दीर्घायुष्य लाभो यासाठी माजी सैनिक त्रिदल संघटनेच्या वतीने तसेच सेवानिवृत्त पोलीस संघटनेच्यावतीने संभाजीनगर रोडवरील डीएसपी चौकातील हुसेन शहा बाबा दर्गा येथे गलेफ व चादर अर्पण करून शहराचे अराध्य दैवत विशाल गणपती मंदिरात प्रार्थना करण्यात आली. (छाया – समीर मन्यार)

# माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृती स्वास्थ्यासाठी माजी सैनिक त्रिदल संघटना व सेवानिवृत्त पोलीस संघटनेच्यावतीने हुसेन शहा बाबा दर्गा व विशाल गणेश मंदिरात प्रार्थना

नगर – माजी आमदार अरुण जगताप यांच्यावर पुणे येथे खाजगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार चालू आहेत. तज्ज्ञ डॉक्टर त्यांच्यावर उपचार करत आहेत. नगर शहरवासीयांच्या वतीने त्यांच्या प्रकृती स्वाथ्यासाठी प्रार्थना केली जात आहे. माजी सैनिक त्रिदल संघटनेच्या वतीने तसेच सेवानिवृत्त पोलीस संघटनेच्या वतीने संभाजीनगर रोडवरील डीएसपी चौकातील हुसेन शहा बाबा दर्गा येथे गलेफ व चादर अर्पण करून शहराचे आराध्य दैवत श्री विशाल गणपती मंदिरात जाऊन गणेश चरणी त्यांच्या प्रकृतीसाठी व दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करण्यात आली.

यावेळी त्रिदल संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब आंधळे, सेवानवृत्त पोलीस संघटनेचे अध्यक्ष जमालभाई शेख, राज्याचे आरोग्य अध्यक्ष युनूस टेंगे, उपाध्यक्ष हरिभाऊ चिरके, दिलावर इनामदार, राजमोहम्मद शेख, अकबर शेख, संजय साठे, दिलावर पठाण, संदीप काकडे, जयकुमार कुट्टी, कॅप्टन मनोहर उबाळे, सुभेदार विनायक मोराळे, सुभेदार तुकाराम जाधव, शिवदास वैभासे, अविनाश कांबळे, खलील शेख आदींसह माजी सैनिक त्रिदल संघटना व सेवानिवृत्त पोलीस संघटनेचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

# अरुण जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिरात 'महाआरती'

नगर – माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिरात ८ एप्रिल रोजी सकाळी महाआरती करण्यात आली. अरुणकाका बरे होवून सुखरुप शहरात परतावे यासाठी श्री विशाल गणेशाला साकडे घालण्यात आले.



माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी श्री विशाल गणपती मंदिरात महाआरती करण्यात आली.

या आरतीसाठी श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते, माजी नगरसेवक संजय चोपडा, विजय गव्हाळे, मनोज कोतकर, मोहन कदम, दीपक सूळ, अमित खामकर, संजय सपकाळ, सुरेश बनसोडे, दीपक खेडकर, आनंद लहामगे, गजेंद्र भांडवलकर, भरत गारुडकर, निलेश बांगरे, संभाजी पवार, अमोल कांडेकर, निलेश इंगळे, राजू पडोळे, प्रभाकर इंगळे, अजय दिघे, बजरंग भुतारे, जालिंदर बोरुडे, पंडितराव खरपुडे, राजू कचरे, माऊली (मामा) गायकवाड, संजय मोरे, अनिल निकम, बाळासाहेब भुजबळ, प्रा. अरविंद शिंदे, माजी नगरसेविका मीनाताई चोपडा, आशाताई निंबाळकर, रेशमा आठरे, रेणुका पुंड, अरुणा गोयल, अलकाताई मुंदडा, स्मिता वाल्हेकर, अंबिका भिसे, उद्धव शिंदे, विशाल बेलपवार, शिवम भंडारी, मेजर गारुडकर, महेंद्र हिंगे, दिपक दरेकर, सर्जेराव तोरडमल, प्रा. भगवान काटे, अनिल निकम, विलास शिंदे, आनंद पुंड, किरण जावळे, संतोष हजारे, अनिकेत येमूल, लहू कराळे, विवेक गायकवाड, अभिजीत सपकाळ, मनीष फुलडहाळे, धर्मा करांडे, लकी खुबचंदानी, अक्षय घोरपडे, अरुण खिची, सुरज शहाणे, ओम पांडे, निलेश इंगळे, गजानन ससाणे, युवराज शिंदे, शैलेश अष्टेकर, सुजाता कदम, तुषार टाक आदींसह नगरकर उपस्थित होते.

माजी आमदार अरुण जगताप यांच्यावर पुणे येथील खाजगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरु असून, त्यांचा प्रकृतीत सुधारणा व्हावी यासाठी शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरात महाआरती पार पडली. यावेळी सर्व भाविकांनी मनोभावे अरुणकाकांच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी श्री विशाल गणेशाला साकडे घातले.

प्रा. माणिक विधाते म्हणाले की, श्री विशाल गणपती हे जागृक देवस्थान असून, सर्वांच्या मनातील इच्छा पूर्ण होतात. अरुणकाका बरे व्हावे ही सर्व नगरकरांच्या मनातील इच्छा आहे. सर्व समाज, जाती–धर्मातील लोकांशी काकांचे घनिष्ठ संबंध आहेत. मोठ्या प्रमाणात त्यांनी आपल्या कार्यातून माणसे जोडली असून, त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी सर्व जाती–धर्माचे लोक प्रार्थना करत आहेत. लवकरच ते बरे होऊन परत शहरात यावे, ही सर्वांची मनापासून इच्छा असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

## कर्जत तहसिल कार्यालयात जप्त वाळू साठ्याचा लिलाव

नगर – कर्जत तालुक्यात जप्त करण्यात आलेल्या १४ ब्रास वाळू साठ्यांचा लिलाव अटी व शर्तीच्या अधिन राहून ११ एप्रिल रोजी दुपारी १ वाजता तहसिल कार्यालय, कर्जत येथे आयोजित करण्यात आला आहे. इच्छुकांनी अनामत रक्कम भरुन लिलावात सहभागी होण्याचे आवाहन तहसीलदार गुरु बिराजदार यांनी केले आहे. लिलावाच्या अटी व शर्ती तहसिल कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, कर्जत तसेच राष्ट्रीय सुचना व विज्ञान केंद्राच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

## ९ एप्रिलला मेहेरबाबा केंद्रात लघु चित्रपट दाखवण्यात येणार

नगर – सरोष पेट्रोल पंपाजवळील अवतार मेहेरबाबा केंद्रात ९ एप्रिलला सायं. ७ ते ९ या वेळेत मेहेरबाबांच्या जीवनावर आधारीत मेहेराबाद येथे तयार झालेले लघु चित्रपट दाखवण्यात येणार आहेत. यात मेहेरबाबांची नाशिक व राहुरी येथील वाढदिवसाची चित्रफीत, आंध्र प्रदेश दौऱ्यातील दृश्ये व जीवनाच्या प्रत्येक टप्प्यात मेहेरबाबा अमेरिका दौऱ्यावरील चित्रफीती दाखवण्यात येणार आहेत.



सेंट विवेकानंद प्री प्रायमरी स्कूलमध्ये लिटिल स्टार ऑलिम्पियाड स्पर्धा उत्साहात झाल्या.

# सेंट विवेकानंद प्री प्रायमरी स्कूलमध्ये लिटिल स्टार ऑलिम्पियाड स्पर्धा उत्साहात

नगर – तारकपूर येथील सेंट विवेकानंद इंग्लिश मिडियम स्कूल येथे पूर्व प्राथमिक विभागासाठी प्रथमच घेण्यात आलेल्या लिटिल स्टार ऑलिम्पियाडला मोठा प्रतिसाद मिळाला. इंग्रजी, गणित, इव्हिएस या विषयांवर झालेल्या या स्पर्धेत नर्सरी, एलकेजी, युकेजीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. प्रत्येक गटातील विजेत्यांना गोल्ड, सिल्व्हा व ब्राँझ पदकाने गौरविण्यात आले.

संस्थेचे उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सेक्रेटरी गोपाल भागवानी यांच्या हस्ते विजेत्यांना मेडल व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. उपाध्यक्ष रुपचंद मोटवानी म्हणाले, शिक्षण व संस्कारांचा सुंदर मिलाफ शाळेत पहायला मिळतो. त्यामुळेच अतिशय कमी वयात प्री प्रायमरीमधील विद्यार्थी आपले कौशल्य सिध्द करून दाखवतात. यासाठी सर्व शिक्षक घेत असलेले परिश्रम कौतुकास्पद आहेत.

लिटिल स्टार ऑलिम्पियाड स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना प्री प्रायमरीच्या प्राचार्या कांचन पापडेजा, शिक्षिका प्रिती कटारिया, दीपा आहुजा, गुंजन पंजवानी, कनन शेरवानी, अमृता करामुंगे आदींनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष रामचंद मेंघानी, खजिनदार दामोदर मखिजा, ट्रस्टी राजकुमार गुरनानी, सुरेश हिरानंदानी, महेश मध्यान, हरेश मध्यान, प्राचार्या गीता तांबे, मुख्याध्यापिका गोदावरी किर्तानी आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.


* दिनांक – 04 एप्रिल ते 10 एप्रिल 2025
टिप :– मुव्ही–शो च्या वेळा बदलु शकतात
CHHAAVA 09:15 AM I 03:15 PM 09:30 PM
EMPURAAN (Hindi) 06:15 PM
SIKANDAR 08:00 AM I 09:00 AM 10:45 AM I 12:15 PM 01:30 PM I 02:05 PM 04:15 PM I 07:00 PM 08:15 PM I 09:45 PM
THE DIPLOMAT 11:45 AM 05:30 AM 10:45 AM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001


# ज्योत्स्ना उद्योग केंद्रात मनो न्याय आणि बालस्नेही संघ स्थापन

## दिव्यांगांसाठी शासकीय योजनांची अंमलबजावणी आणि मार्गदर्शनाचे केंद्र ठरणार प्रभावी

नगर – शहरातील मतिमंद विकास शिक्षण मंडळ संचलित ज्योत्स्ना उद्योग केंद्र सोसायटी कार्यशाळेत मनो न्याय आणि बालस्नेही संघाची स्थापना करण्यात आली. ही स्थापना राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या २०२४ च्या निर्देशानुसार करण्यात आली असून, मनोरुग्ण आणि बौद्धिक दृष्ट्या दिव्यांग व्यक्तींना न्याय व शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

या संघाच्या माध्यमातून दिव्यांग मुलांना विविध शासकीय सेवा, सुविधा, घरकुल योजना आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी असलेल्या शासकीय योजनांची माहिती, मार्गदर्शन आणि अंमलबजावणी करण्यात येणार आहे. संघ स्थापनेच्या प्रसंगी ॲड. राजाभाऊ शिर्के, ॲड. भक्ती शिरसाठ, ॲड. आशा गोंधळी, इथापे, ॲड. ज्ञानेश्वर दाते, प्रभाकर धिरडे, अल्लाउद्दीन शेख यांच्यासह विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य, दिव्यांग विद्यार्थी व त्यांचे पालक उपस्थित होते.



शहरातील मतिमंद विकास शिक्षण मंडळ संचलित ज्योत्स्ना उद्योग केंद्र सोसायटी कार्यशाळेत मनो न्याय आणि बालस्नेही संघाची स्थापना करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित असलेले पालक.

कार्यक्रमात ॲड. राजाभाऊ शिर्के यांनी दिव्यांगांसाठी अस्तित्वात असलेल्या कायद्यांविषयी सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या हक्कांची जाणीव होणे आणि त्याचे संरक्षण होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. समाजाने या घटकाला समजून घेऊन त्यांच्या विकासासाठी एकत्र प्रयत्न करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात योगेश आल्हाट यांनी या संघाच्या स्थापनेमागचा उद्देश स्पष्ट करत दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या हक्कांसाठी सक्षम करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. उपस्थित पालकांपैकी जोतीराम फरतडे, नारायणे, रणजीत गांधी यांनी योजनांबाबत आपल्या शंका मांडल्या. त्यांना संबंधित तज्ज्ञांनी समर्पक उत्तरे देत अडचणींचे निरसन केले.

सूत्रसंचालन सुशीला जाधव यांनी केले. आभार भाऊसाहेब कदम यांनी मानले. उपस्थितांच्या सहभागातून दिव्यांगांसाठी समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी या उपक्रमाचे महत्त्व कार्यक्रमातून अधोरेखित करण्यात आले.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **जाहेदा शफिक शेख, रा. घर नं. ५१०८, पटवेकर गल्ली, अहमदनगर.** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर मिळकत विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले आहे. सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण,दान,बक्षिस,पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा तुकडी अहिल्यानगर / अहमदनगर पो. तु. ता. नगर पैकी अहिल्यानगर / अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे शहर अहमदनगर येथील सिटी सर्व्हे नं. ३८८५ चे क्षेत्र १४६.३ चौ. मी. यावर बांधकाम केलेल्या मधुसूदन बी. अपार्टमेंट मधील विद्यमान मालक यांच्या मालकीचा दुसऱ्या मजल्यावरील सदनिका नं. २०१ चे क्षेत्र ४८.५१ चौ.मी. या संपुर्ण फ्लॅट मिळकती बाबत.**

**यांसी चतु:सिमा :**

पुर्वेस – सि.स.नं.३६८६ दक्षिणेस – रस्ता
पश्चिमेस – सि.स.नं.३८८४ उत्तरेस – सदनिका क्र. २०२

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

दि. ०८/०४/२०२५
अहमदनगर.

**ॲड. नाजिम अहमद इस्माईल शेख**
**ॲड. कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८

## जाहीर प्रकटन

आमचे अशिल श्री. अनिरुध्द माणिक आडसुळ, चेअरमन **साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्था, अहमदनगर** याद्वारे जाहीर प्रकटन करतात की,

**मिळकतीचे वर्णन** :- डि।। अहिल्यानगर, सब डि।। व तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे नालेगाव येथील खालील वर्णनाच्या मिळकती :- १) **सि.स.नं. ७३९३/१ च्या वायव्य दिशेतील १८५.८७ चौ.मी. बांधकामासहीत असलेली मिळकत, यांसी चतुसिमा पूर्व सि.स.नं. ७३९३ पैकी दक्षिण सि.स.नं.७३९३ पैकी, पश्चिम : बालिकाश्रम रोड, उत्तर : सुरेश अपार्टमेंट, २) साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्था पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट यांचे मालकीची सि.स.नं. ७३९३/ २ याचे क्षेत्र ४७६४.३८ चौ. मी. बांधकामासहीत असलेली मिळकत, यांसी चतुः सिमा पूर्व सि. स.नं. ७३९३ पैकी व सि.स.नं. ६९११, दक्षिण सि. स.नं. ७३९३ पैकी, पश्चिम बालिकाश्रम रोड, उत्तर सि.स.नं. ६९०६, ३) साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्था पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट यांचे मालकीची सि.स.नं. ७३९४/२ याचे क्षेत्र ११०५.६२ चौ.मी. बांधकामासहीत असलेली मिळकत, यांसी चतुः सिमा पूर्व सि.स.नं. ७३९३ पैकी व सि.स.नं.६९११, दक्षिण सि.स.नं. ७३९३ पैकी, पश्चिम बालिकाश्रम रोड उत्तर सि.स.नं. ६९०६** येणेप्रमाणे चतुः सिमापूर्वक मिळकती यामधील तदंगभुत वस्तुसह, वहिवाटीचे, वागणुकीचे हक्कांसह काहीही एक राखून न ठेविता असे.

वरील नमूद मिळकतींचे आमचे अशिल श्री. अनिरुध्द माणिक आडसुळ, चेअरमन **साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्था, अहमदनगर** हे कायदेशीर मालक असून सदर मिळकतींबाबत अहमदनगर मर्चन्टस को ऑप बँक लि. प्रधान कार्यालय, मार्केटयार्ड, अहमदनगर आणि आमचे अशिल यांचेमध्ये विविध दिवाणी प्रकरणे मे. कोर्टामध्ये चालू असून प्रलंबित आहेत, ती खालीलप्रमाणे :-

**१) स्पे. सि. सुट (सि.डि.) नं. २१२/२०११**
**२) लवाद मुकदमा नं. ७३/२०२०**
**३) डि. आर. टी. कोर्ट, औरंगाबाद एस अे ११९ / २०२३**

वरील नमूद बँकेने आमचे अशिल यांची वरील नमूद मिळकत ही फसवणूक करून आणि बेकायदेशीरपणे स्वतःचे कब्जात घेऊन ताब्यात ठेवलेली आहे आणि ते ऑनलाईन / ऑफलाईन लिलावाद्वारे किंवा खाजगी कराराद्वारे सदर मालमत्ता विकणार आहेत.

उपरोक्त मालमत्तेच्या खरेदीसाठी जे कोणी बोली लावण्याचा प्रयत्न करतील किंवा करणार आहेत त्यांना ताकीद देण्यात येते की, आम्ही आमच्या वरील मालमत्तेच्या बेकायदेशीर विक्रीचे संरक्षण विविध कायदेशीर कार्यवाहीद्वारे पूर्ण ताकदीने करणार आहोत. उपरोक्त मालमत्तेवर असलेली विविध न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असून ही नमूद मालमत्ता जो कोणी खरेदी करेल त्याने ती केवळ त्यांच्या जोखीम, किंमत परिणाम आणि नुकसान लक्षात घेऊन ती खरेदी करावी.

सबब वरील नमूद मिळकतीच्या खरेदीपोटी कोणाचीही फसगत होऊ नये याकरीता सदरचे जाहीर प्रकटन वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करीत आहोत.

दि. ०८/०४/२०२५
अहमदनगर

**ॲड. प्रकाश नामदेव सावंत**
बी. ए., एलएल.बी., एलएल. एम.
बार रुम नं. १, नवीन जिल्हा न्यायालय इमारत,
अहमदनगर ४१४००३ मो.नं. ९८६००२६००२


Ahilyanagar's 1st Dolby 7.1 & Dolby Atmos Theater
SHOW TIMING - 4 APRIL - 10 APRIL 2025
सिकंदर द डिप्लोमॅट छावा
10.00AM I 12.00PM 12.30PM I 03.00PM 05.00PM I 05.30PM 08.00PM I 10.15PM
02.30PM 07.30PM 10.30PM
09.00AM I 10.15AM 01.15PM I 04.15PM 07.15PM I 10.00PM
टीप: शो च्या वेळा बदलू शकतात
Box Office bookmyshow
Near Nagar College, Above Zudio, A.nagar.
9881300400, 0241-2346000
Cinélife MINIPLEX


# महावीर जयंतीनिमित्त १० एप्रिल रोजी कत्तलखाना व मांस विक्री दुकाने बंद

नगर – दरवर्षी महावीर जयंती निमित्त कत्तलखाना व मांस विक्री दुकाने बंद ठेवण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार १० एप्रिल रोजी महावीर जयंती निमित्त कत्तलखाना व मांस विक्री दुकाने बंद ठेवण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांनी संबंधित विभागांना दिल्या आहेत.

## जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटन द्वारे तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील तपशीलात नमुद केलेली मिळकत ही विद्यमान मालक नामे **शितल चंद्रकांत लहारे रा. लक्ष्मीनगर समोर, तपोवन रोड, अ.नगर.** यांचे मालकीची असुन विद्यमान मालक नामे शितल चंद्रकांत लहारे यांनी दि. ३१/०१/२०२५ रोजी सदर मिळकतीची विसारपावती आमचे अशील **सय्यद अल्ताफ शफी,** रा.मुकुंदनगर अ.नगर यांचे बरोबर केलीली असुन आमचे अशील यांचेकडुन विसाराची रक्कम देखील स्विकारलेली आहे.तसेच ठरलेल्या ३ महिनेच्या मुदतीत सदर मिळकतीचे खरेदीखत लिहून व नोंदवुन देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे.आमचे अशिल सदरची मिळकत खरेदी घेण्यास तयार आहे.

तरी सदर जाहीर प्रगटन व्दारे तमाम लोकास कळविण्यात येते की, **शितल चंद्रकांत लहारे रा. लक्ष्मीनगर समोर, तपोवन रोड, अ.नगर.** यांचे बरोबर कोणीही खालील तपशीलात नमुद केलेली मिळकतीचे कोणतेही प्रकारचे खरेदी, विक्री, गहाण,दान,बक्षीस, साठेखत, कुलमुखत्यारपत्र, हस्तांतरणाचे कोणतेही प्रकारचे व्यवहार करु नये व विना कारण आपली आर्थिक फजगत करुन घेऊ नये व अगर सदर मिळकतीबाबत कोणीही कोणतेही प्रकारचे खरेदी,विक्री, गहाण,दान, बक्षीस, साठेखत, लिव्ह अॅण्ड लायसेन्सी, कुलमुखत्यारपत्र, हस्तांतरणाचे कोणतेही प्रकारचे व्यवहार केल्यास सदरचे व्यवहार व केलेले बेकायदेशीर दस्त आमचे अशिल **सय्यद अल्ताफ शफी** यांचेवर मुळीच बंधनकारक राहणार नाही व संबंधीतांना सदर मिळकतीची कुठल्याही प्रकारे कायदेशीर व स्वच्छ, बाजारी, मालकी, हितसंबंध व टायटल प्राप्त होणार नाही याची तमाम लोकांनी सदर जाहिर प्रगटन द्वारे नोंद घ्यावी.

**मिळकत वर्णन** - जिल्हा तुकडी अहिल्यानगर / अहमदनगर पो. तु. नगर पैकी महानगरपालिका हद्दीतील मौजे **भिंगार** येथील गोविंदपूरा भागातील रो - हाऊस मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| स. नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
| --- | --- | --- |
| ३४३ / १ब | २९ | ८१.८८ चौ. मीटर. |

यापैकी पुर्व बाजुकडील प्लॉट त्याचे क्षेत्र ४०.९३ चौ. मी. त्यावरील बांधकामासह मिळकत तसेच बाकीची मागे व पुढे खुली जागा असून यातील इले. लाईट मीटर व पाण्याचे नळ कनेक्शनसह संपूर्ण रो–हाऊस ब्लॉक मिळकतीबाबत. याचा रो–हाऊस ब्लॉक नं ३ असे आहे.

**यांसी चतु:सिमा :**

पुर्वेस – प्लॉट नं. २८ दक्षिणेस – प्लॉट नं. २४
पश्चिमेस – प्लॉट नं.२९ पैकी उत्तरेस – ३ मीटर अंतर्गत रस्ता

विनाकारण कोणाचीही आर्थिक फसवणुक होऊ नये या उद्देशाने आमचे अशिलाने सदर मिळकतीच्या जाहिर प्रगटन दिले असे.

दि. ०८/०४/२०२५
अहमदनगर.

**ॲड. नाजिम अहमद इस्माईल शेख**
**ॲड. फैजान फारुक कुरेशी**
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८

# जैन कॉन्फरन्स नवी दिल्लीचा महाराष्ट्र प्रांतीय मंत्रीपदी ईश्वर भंडारी यांची निवड

नगर – जैन समाजाची मातृसंस्था अखिल भारतीय श्वेतांबर



स्थानकवासी जैन कॉन्फरन्स नवी दिल्लीच्या महाराष्ट्र प्रांतीय मंत्रीपदी आश्वी बुद्रुक येथील सामाजिक धार्मिक क्षेत्रात कार्यरत असलेले जैन श्रावक संघ आश्वी बुद्रुकचे उपाध्यक्ष ईश्वर मुळचंद भंडारी यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र चतुर्थ झोनचे प्रांतीय अध्यक्ष मोहनलाल लालचंद लोढा यांनी निवड केली आहे.

# दित्तीय वर्ष बीडीएस परीक्षेत लुबेना रामपूरावाला प्रथम

नगर – स्व. यशवंतराव चव्हाण मेमोरिअल मेडिकल अँड रुरल





डेव्हलपमेंट फाऊंडेशन डेंटल कॉलेज अँड हॉस्पिटल, अहिल्यानगर च्या विद्यार्थीनी लुबेना बुऱ्हाणुद्दीन रामपूरावाला या डिसेंबर २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या दित्तीय वर्ष बी.डी.एस.च्या परीक्षेत ७४.०२ टक्के गुण मिळवून कॉलेज मध्ये प्रथम आल्या. त्यांनी ६०० पैकी ४४५ गुण मिळविले. त्यांच्या या यश बद्दल विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

फंडू एसएमएस

दोस्त आपकी दोस्ती का क्या खिताब दे,
करते हैं इतना प्यार की क्या हिसाब दे।
अगर आपसे भी अच्छा फूल होता तो ला देते,
लेकिन जो खुद गुलदस्ता हो उसे क्या गुलाब दे।

ऐसा क्या लिखूं की
तेरे दिल को तसल्ली हो,
क्या ये बताना काफी नहीं
की मेरी जिंदगी तुम हो।

दर्द कितना खुशनसीब हैं
जिसे पा कर लोग अपनों को
याद करते हैं, दौलत कितनी बदनसीब हैं जिसे
पा कर लोग अक्सर अपनों को भूलते हैं




# स्वप्नांना पंख नवे

आयआयएम अहमदाबादसारख्या प्रख्यात संस्थेत प्रवेश मिळवणं भल्याभल्यांना कठिण जातं. पण प्राची सुखवानीने हा गड सर केला. प्राची हुशार आहेच पण महत्त्वाचा मुद्दा हा की अंध असूनही तिने हे यश मिळवलंय.



अचिव्हर

आयआयएम अहमदाबादसारख्या नामांकित संस्थेतून एमबीए करून खोऱ्याने पैसा ओढणं हे अनेक तरूणांचं स्वप्न असतं पण आयआयएम अहमदाबादमध्ये प्रवेश मिळवणं सोपं नक्कीच नाही. यासाठी बरीच मेहनत करावी लागते. तासनतास पुस्तकात डोकं घालून बसल्यानंतर कुठे तरी संधी मिळण्याची शक्यता निर्माण होते. एकवीस वर्षांच्या प्राची सुखवानीने ही अवघड गोष्ट साध्य करून दाखवली आहे. आता यात आश्चर्य वाटण्यासारखं काय, असा प्रश्न तुमच्या मनात येणं अगदी स्वाभाविक आहे. आपल्या देशात हुशार मुलांची कमतरता नाही. त्यामुळे आयआयएम अहमदाबादमध्ये प्रवेश मिळवण्यात एवढं कौतुक कशाला, असं कुणालाही वाटू शकतं. पण दखल घेण्याजोगी बाब म्हणजे प्राची अंध आहे. अंध असूनही तिने हे यश मिळवलंय. शारीरिक अपंगत्त्व आलं तरी हार मानायची नाही, असं तिने ठरवलं.

तिसरीत असताना तिला अंधुक दिसू लागलं. मॅक्युलर डायस्ट्रॉफी नावाच्या विकारामुळे तिची दृष्टी गेली. प्राची ८० टक्के अंध आहे. म्हणजे तिला जवळपासचं काहीही दिसत नाही. या विकारावर अजूनही औषध सापडलेलं नाही. पण यामुळे प्राची अजिबात खचली नाही. आपली स्वप्नं पूर्ण करण्यापासून तिला कुणीही रोखू शकलं नाही. कॅट परीक्षेत तिला ९८.५५ टक्के मिळाले. तिने बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन केलंय. प्राचीने अपंगांच्या कोट्यातून ही परीक्षा दिली.

इतर अनेक तरूणांप्रमाणे प्राचीनेही स्वप्नं पाहिली आहेत. ही स्वप्नं तिला पूर्ण करायची आहेत. एमबीए झाल्यानंतर तिला बहुराष्ट्रीय कंपनीत नोकरी करायची आहे. पुरेसा पैसा जमवायचा आहे. पुरेसा अनुभव मिळाल्यानंतर तिला स्वत:ची कंपनी सुरू करायची आहे. पण प्राची एवढ्यावरच थांबणार नाही. तर आपल्यासारख्या अंध मुलांना तिला मदत करायची आहे. यासाठी एनजीओ सुरू करण्याचा तिचा मानस आहे. विशेष म्हणजे हे तिचं दीर्घकालीन उद्दीष्ट आहे.

लहानपणापासूनच अभ्यासात हुशार असलेल्या प्राचीला आयआयएम बंगलोर आणि कोलकाता मधूनही बोलावणं आलं होतं. पण आयआयएम अहमदाबादची संधी तिला सोडायची नव्हती. या यशाबद्दल तिचं बरंच कौतुक होतंय. आपण आयुष्यातल्या छोट्या छोट्या अडचणींचा बाऊ करतो, अपयशाची अनेक कारणं देतो पण काही करायचं ठरवलं तर कोणतीही अचडण, अडथळा तुम्हाला थांबवू शकत नाही हे प्राचीने दाखवून दिलंय. प्राचीकडून बरंच काही शिकण्यासारखं आहे.

# एकटेपणा दूर सार



मी तीस वर्षांचा युवक असून उच्च शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरीच्या निमित्ताने परदेशी रहात आहे. या देशात येऊन दोन वर्ष पूर्ण होत आहेत. परदेशातील नोकरीचं अप्रूप असल्यामुळे मातापित्यांना सोडून मी इथे निघून आलो पण या देशातील लोक परकीय लोकांना जास्त जवळ करत नाहीत हे आता लक्षात आलं आहे. इथे मला एकही मित्र अथवा मैत्रीण नाही. कोणीही घरी बोलावत नाही. स्वदेशीयांचं मंडळ आहे पण त्यातील बहुतांश संसारी असल्यामुळे मी 'ऑड मॅन आऊट' ठरतो. अशात एकटेपणा भेडसावत आहे. काय करू?

मॅच मेकिंग

**उत्तर :** केलेल्या विवेचनावरुन तू समाजात रमणारा जीव आहेस हे स्पष्ट दिसतंय. खरं तर आपण भारतीय अत्यंत संवेदनशील, भावनाशील आणि कुटुंबवत्सल असतो. त्यामुळे एकट्याने रहायची वेळ आली तर त्रास होतो. तू हा त्रास भोगतो आ-हेस पण फार काळ एकटा राहू नकोस. अन्यथा, डिप्रेशनमध्ये जाशील. लग्नाचा विचार असल्यास हा निर्णय लवकर घेऊन तू सोबत मिळवून शकतोस. आता तिथे चांगलं बस्तान बसलं असेल तर आई-वडिलांना तिकडे नेऊन तू त्यांच्या सहवासात राहू शकतोस. एकटा रहात असशील तर एखाद्या मोठ्या घरात शिफ्ट होऊन तू रूम पार्टनर घेऊ शकतोस. त्यामुळेही तुझं एकटेपण कमी होईल. असे अनेक पर्याय समोर आहेत. योग्य वाटेल त्याचा अवलंब कर पण निराशावस्था कुरवाळू नकोस.

# वेगाशी स्पर्धा नको!



टेक केअर

कॉलेजगोईंग बॉईज किंवा चांगले मार्क पडले की पहिलं गिफ्ट काय असेल तर बाईक. मग या बाईकवर स्वार होऊन सैराट होणं हे ओघानं आलचं. परंतु बाईकवरुन वाऱ्याशी दोस्ती, मित्रांबरोबर रेस, सुसाट गाडी पळवणं हे टाळायला हवं.

- आपल्याला छानपैकी गाडी ड्राईव्ह करता येते; त्यामुळे कशीही चालवली तरी चालतं असं वाटून आपण वाहतुकीचे नियम विसरुन जातो.
- बाईक चालवताना एका हातात मोबाईलवर संभाषण सुरु आणि दुसरा हात गाडीच्या हॅंडलवर, असं धाडस अंगलट येऊ शकतं. त्यामुळे बाईक एका बाजूला घेऊन मोबाईलवर बोलणं उत्तम.
- कानामध्ये मोबाईलची कॉड घालून गाडी चालवणं टाळा. मागून आलेल्या वाहनांनी हॉर्न दिला तरी ऐकू येणार नाही.
- जवळच्याच पर्यटनस्थळाला मित्रांबरोबर रेस लावत जाणं कुणाला आवडणार नाही? हे थ्रील अनुभवताना गाडीचे ब्रेक, टायर व्यवस्थित चेक करा.
- कडक उन्हामुळे रस्त्यावरील डांबर पिघळतं. त्यामुळे गाडीची टायर फुटणं, पंक्चर होणं अशा समस्या उद्‌भवू शकतात. त्यामुळे या दिवसात सर्व्हिसींग करणं गरजेचं ठरतं.
- परीक्षेच्या काळात गाडीच्या कंडिशनकडे आपलं लक्ष नसतं. परंतु नंतर वेळ मिळताच गाडीचं टायर, ब्रेक चेक करुन घेणं उत्तम ठरतं.
- बाहेरगावी जाताना गाडीची महत्वाची कागदपत्रं, लायसन्स जवळ आहे की नाही याची खात्री करायला हवी.
- स्टाईलखातर नवीन बाईकच्या मॉडेलमध्ये बदल केले जातात. गार्ड काढणं, हॅंडलची लांबी कमी-जास्त करणं यामुळे खड्डे चुकवताना मानेला, पाठीला कंबरेला दुखापत होण्याची शक्यता जास्त असते कंपनीने गाडीचं मॉडेल जसं तयार केलं आहे, तसंच वापरायला हवं. त्यामध्ये बदल करणं टाळावं.
- गाडी उतारावर पार्क करताना गिअर टाकूनच पार्क करणं उत्तम ठरतं. त्यामुळे गाडी घसरत मागे येत नाही.

सुट्टीत गाडी पळवताना ही पथ्यं पाळून धमाल करा.



# उन्हाळ्यातल्या कूल लूकसाठी...

फॅशन पॅशन

दोस्तांनो, समर वॉर्डरॉब अपडेट करायला तुम्ही सुरूवात केली असेल. आता दोस्तमंडळी फॅशनचे धडे कुणाकडून घेणार? अर्थातच बॉलिवूड सेलेब्जकडून. शाहीद कपूर, वरूण धवन, आदित्य रॉय कपूर सारख्या हॉट स्टार्सनी समर फॅशन कॅरी करायला सुरूवात केली आहे. सनशाईन शेड्सपासून हवाईयन प्रिंट्सपर्यंत ते बरंच काही मिरवताहेत. उन्हाळ्यात पर्याय असतो तो ट्रेंडी शर्टसचा. मग काय, थोडी भटकंती करा आणि या उन्हाळ्याचा सामना स्टाईलने करण्यासाठी सज्ज व्हा.

- सनशाईन येलो सध्याचा हॉट फेवरेट रंग आहे. हा रंग तुम्हाला क्लासी लूक देतो. ऑफ व्हाईट पॅंट आणि ब्लॅक शूजचं कॉम्बिनेशन करा आणि स्टायलिश अंदाजात बाहेर पडा.
- ॲलोहा शर्ट किंवा हवाईयन प्रिंट हा खूप चांगला ऑप्शन आहे. ब्लॅक किंवा ब्लू डेनिम्ससह हे शर्ट स्टाईलमध्ये कॅरी करता येतील.
- हॅंडलूम ट्राय करायचं असेल तर राखाडी रंगाचा कुर्ता स्टाईल शर्ट कॅरी करा. सध्याच्या गरम दिवसात अशा शर्टमुळे तुम्हाला निवांत वाटेल. डेनिम्स आणि बूट कॅरी करा आणि रॉकिंग दिसा.

ट्रॉपिकल प्रिंटवाले हाफ स्लीव्हड शर्टचा ट्रेंडही जोरात आहे. कॅज्युअल लूकसाठी रिप्ड जीन्स आणि स्पोर्टस शूज घ्या.

- फुल स्लीव्हजवाला प्रिंटेड शर्टही तुम्हाला कॅरी करता येईल. तुम्ही वेगवेगळ्या प्रिंट्सचं कॉम्बिनेशन करू शकता. फ्लिपफ्लॉप प्रिंटवाले शर्ट उन्हाळ्यात कूल लूक देतात. डेनिम्स आणि स्नीकर्ससह हटके लूक मिळवा.

# स्मार्ट करिअरसाठी...

फ्युचर ऑप्शन

दहावी-बारावीच्या परीक्षा संपल्या आहेत. प्रत्येकजण करीअरचे वेगवेगळे ऑप्शन्स धुंडाळत आहे. काही मुलांना थोडी वेगळी वाट निवडायची असेल. अर्थात वेगळं करायचं म्हणजे नेमकं काय, याबाबत आवड आणि करीअर यांची सांगड घालताना तारेवरची कसरत होत असेल. अशा मुलांसाठी विविध क्षेत्रातल्या अभ्यासक्रमांची ही यादी उपयुक्त ठरू शकेल. आवडीच्या अभ्यासक्रमाचा पर्याय निवडून तुम्ही उत्तम करीअर घडवू शकाल. काही अभ्यासक्रमांची ही माहिती...

- इतरांना मदत करायची इच्छा असेल तर यात व्यावसायिक पदवी मिळवता येईल. 'बॅचलर ऑफ सोशल वर्क' ही पदवी मिळवून समाजाच्या उत्कर्षासाठी काम करता येईल.
- लिखाणाची आवड आणि बातम्यांची जाणीव असेल तर 'बॅचरल इन मास कम्युनिकेशन ॲंड जर्नलिझम' हा अभ्यासक्रम निवडता येईल. मास कॉम केल्यानंतर जाहिरात किंवा पब्लिक रिलेशन्समध्येही करीअर करता येईल.
- ॲनिमेशन आणि मल्टीमिडियाम ध्येही खूप चांगल्या संधी आहेत. 'बॅचलर इन ॲनिमेशन ॲण्ड मल्टीमिडिया' प्रोग्रामची निवड तुम्ही करू शकता.
- नृत्य किंवा गायनकौशल्य असेल तर परफॉर्मिंग आर्टसमध्ये करीअर करता येईल.
- परदेशी भाषा शिकलेल्यांना बरीच मागणी असते. स्पॅनिश, मॅंडरिन, जर्मन, फ्रेंच किंवा तुमच्या आवडीची परदेशी भाषा शिकून विविध क्षेत्रात करीअर करता येईल. परदेशात जाण्याच्या संधीही उपलब्ध होतील.
- चित्रपटाचं विश्व खुणावत असेल तर डिप्लोमा इन फिल्ममेकिंग ॲण्ड व्हिडिओ एडिटिंगचा पर्याय आहे.
- इव्हेंट मॅनेजमेंटम ध्ये असलेल्या संधी लक्षात घेता डिप्लोमा इन इव्हेंट मॅनेजमेंटचा पर्याय आहे.
- एविएशन क्षेत्राची आवड असेल, उंच भरारी घ्यायची असेल तर एअर होस्टेस/केबिन क्रू प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण करून विमान कंपनीत नोकरी मिळवता येईल.
- बॅंकिंग क्षेत्रात करीअर करायचं असेल तर बॅंकिंग ॲण्ड फायनान्सशी संबंधित अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

# सदाबहार सॅक



ॲक्सेसरीज

कुल लूकसाठी तुमच्या पोशाखाला शोभेल अशी छान सॅक हवी. हल्ली वेगवेगळ्या प्रकारच्या सॅक बाजारात दिसतात. लेदरच्या मेसेंजर सॅकमुळे हटके लूक येऊ शकतो. ही छान स्टाईलही होते आणि यामध्ये सर्व साहित्य ठेवून बाईक चालवताना शोल्डर वेअर सॅक कंफर्टेबल ठरते. रेड, काळा, ब्राऊन रंग मिळू शकतो. व्हाईट शर्ट ब्लॅक जिन्सवर ब्लॅक सॅक, ब्राऊन सॅक असा कुल लूक दिसेल.

पाठीवरील सॅकबरोबर हातातून कॅरी करता येईल अशाही सॅक पहायला मिळतात. तुम्हाला बसने प्रवास करायचा असेल तर ही सॅक कंफर्टेबल ठरेल.

कॅमेऱ्यासाठीही कॅमेरा बॅग हवी. पण ही मात्र कॅमेरा, मोबाईल, चावी इत्यादी वस्तू बसतील अशीच असते. यात जास्त हेवी साहित्य ठेवणं टाळलेलं बरं. ही एक शोल्डर बॅगच आहे. हीसुद्धा वेगवेगळ्या रंगात मिळू शकेल. फक्त बाईकवरुन कॅरी करताना थोडी बळकट कॅमेरा बॅग खरेदी करावी. जेणेकरुन ट्रॅफिकमधून जाताना ही कशामध्येही अडकून कॅमेऱ्याचे नुकसान होणार नाही.

होबोज हॅंडबॅग किंवा शोल्डर सॅकही छानशा रंगात उपलब्ध आहेत. नोटबुक, बुक आणि अन्य साहित्य ठेवण्यासाठी कप्पे असल्यामुळे या सॅक कॅरी करायला कंफर्टेबल वाटतील.


टेक्नो टॉक

## स्मार्टवॉच घेताय?



सध्या स्मार्टफोनप्रमाणेच स्मार्टवॉच ही सुद्धा काळाची गरज आहे. हातात एखादं स्मार्टवॉच हवंच. तुम्हीही स्मार्टवॉच घेण्याच्या विचारात असाल तर या टिप्स नक्कीच उपयोगी पडतील. ● महागडं स्मार्टवॉच घेताना त्याची ओएस कॉम्पिबिलिटी तपासून बघा. म्हणजेच ते स्मार्टवॉच ॲंड्रॉईड आणि आयओएस अशा दोन्ही ओएस सिस्टिमवाल्या फोनशी कनेक्ट व्हायला हवं. ● तुमच्याकडे आयफोन असेल तर ॲपलचं स्मार्टवॉच घेणं योग्य ठरेल. ॲंड्रॉईड स्मार्टफोन असल्यास वेअर ओएसवालं स्मार्टवॉच खरेदी करा. ● महागड्या स्मार्टवॉचमधल्या फिटनेस फीचर्सकडे लक्ष द्या.

## ॲप डाउनलोड करताना...




दोस्तांनो, गूगल प्ले स्टोरवर असंख्य ॲप्स उपलब्ध आहेत. आपणही गरजेनुसार ॲप्स डाउनलोड करत असतो. मात्र ॲप्स डाउनलोड करताना काही गोष्टी ध्यानात ठेवणं गरजेचं असतं. ● ॲप्स डाउनलोड केल्यानंतर काही परमिशन्स मागितली जातात. मात्र तुम्ही सगळ्या परमिशन्स देऊ नका. गरजेनुसार परमिशन्स द्या. ● आपल्या स्मार्टफोनमध्ये एकाच पद्धतीची बरीच ॲप्स असतात. आज असंख्य शॉपिंग ॲप्स आहेत. यासोबतच फ्लाईट बुकिंग, कॅब बुकिंग तसंच अन्य बुकिंग्जसाठीही असंख्य ॲप्स आहेत. मात्र सगळी ॲप्स डाउनलोड करू नका. एकाच ॲपची निवड करा आणि त्यावरून बुकिंग करा. ● ॲक्टिविटी ट्रॅकिंगचा पर्याय बंद ठेवा. यामुळे स्मार्टफोनची बॅटरी जास्त खर्च होणार नाही.

## व्हॉट्स ॲप ठेवा सुरक्षित



आजच्या काळात सोशल मीडिया अकाउंटची सुरक्षा खूप गरजेची असते. फेसबुक असो किंवा व्हॉट्स ॲप, ही अकाउंट्स हॅक होऊ शकतात. म्हणूनच या ॲप्समध्ये सुरक्षेसी संबंधित काही फीचर्स असतात. तुम्ही व्हॉट्स ॲपमधील सुरक्षेशी संबंधित फीचर्सचा वापर करून अकाउंट सुरक्षित ठेऊ शकता. यासाठी तुम्ही वॉट्स ॲप लॉक करण्याचा पर्याय निवडू शकता. यासाठी आधी वॉट्स ॲप ओपन करा. त्यानंतर उजवकडच्या तीन डॉट्सवर क्लिक करा. सेटिंग्ज मध्ये जा. प्रायव्हसी ऑप्शन निवडा. खालच्या बाजूला फिंगरप्रिंट लॉकचा पर्याय निवडा. हे फीचर ऑन करा. यामुळे तुमच्या फिंगरप्रिंटशिवाय फोनमधलं व्हॉट्स ॲप ओपन होणार नाही.

## ऑनलाईन शॉपिंग करताय?



सध्याच्या काळात ऑनलाईन शॉपिंगचं प्रमाण प्रचंड वाढलं आहे. विविध ॲप्स आणि वेबसाईट्सच्या माध्यमातून ऑनलाईन शॉपिंग केलं जातं. पण या द्वारे फसवणूकही होऊ शकते. बनावट वेबसाईट्सच्या माध्यमातून ग्राहकांकडून पैसे उकळले जातात. अशीच एक घटना मध्यंतरी घडली. म्हणूनच फेक ऑनलाईन वेबसाईट्सची ओळख पटवणं गरजेचं आहे. वेबसाईट ओपन केल्यावर ॲड्रेसबारमध्ये एटीटीपी आहे की एचटीटीपीएस आहे हे आधी जाणून घ्या. एसचा अर्थ असा की ही वेबसाईट आर्थिक व्यवहार करण्यासाठी सुरक्षित आहे. मात्र एस नसल्यास सावध रहा. वेबसाईट सुरक्षित असल्यास ॲड्रेसबारमध्ये लॉकची खूणही दिसते. बरीच सवलत मिळत असेल तर सावध रहा.

# नगर शहरासह जिल्ह्यातील दुर्लक्षित मुद्यांना जिल्हा नियोजन विकास समितीने प्राधान्य द्यावे

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी घेतलेल्या बैठकीत निमंत्रित सदस्य सुहास मुळे यांनी मांडले विविध प्रश्न

नगर – जिल्हा नियोजन विकास समितीच्या निमंत्रित सदस्यांची आणि विभाग प्रमुखांची आढावा बैठक जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी घेतली. सदर बैठकीला जिल्हा नियोजन विकास अधिकारी दीपक दातीर, निमंत्रित सदस्य भूषण देशमुख, सुहास मुळे, ज्ञानेश शिंदे, आबिद खान, बहिरनाथ वाकळे, अभिजीत वाघ तसेच अनेक विभागांचे प्रमुख उपस्थित होते. या बैठकीत सुहास मुळे यांनी शहरासह जिल्ह्यातील दुर्लक्षित मुद्यांना जिल्हा नियोजन विकास समितीने प्राधान्य द्यावे अशी मागणी करत विविध प्रश्न यावेळी मांडले.

या बैठकीत बोलताना मुळे म्हणाले, जिल्हा विकास नियोजनासाठी शासन दरवर्षी कोट्यावधी रुपयांची तरतूद करते, त्यामध्ये सामान्यांना अपेक्षित असलेला विकास याचा देखील विचार होणे गरजेचे आहे.कुठल्याही क्षेत्राचा विकास ज्या मूळ मुद्यांमुळे होतो ते मुद्दे म्हणजे वीज आणि पाणी याची उपलब्धता व त्या अनुषंगाने उद्योग, व्यवसाय, रोजगार, रस्ते, वाहतुकीची साधने व जवळच्या शहरांशी असलेली रेल्वे विमानसेवा यासारख्या अत्याधुनिक सुख सोयींची कनेक्टिव्हिटी होय.

वास्तविक आपला जिल्हा हा लगतच्या तीन राज्यांचा केंद्रबिंदू असून येथून पाचशे वर्षांपासून तिन्ही राज्यांना उत्कृष्ट ऐतिहासिक कनेक्टिव्हिटी आहे. तरीही उद्योग, कारखानदारी याबाबत प्रगती तर नाहीच, परंतु प्रचंड अधोगती आहे. उच्च दर्जाचे रोजगारच उपलब्ध नाही आणि त्यामुळे सुशिक्षित तरुणांचा आपल्याच शहरात रहिवास करण्याची इच्छाशक्ती आणि त्यायोगाने होणारे वसाहतवादाचे आणि पैशाचे चलनवलन याचा आलेख निराशाजनक आहे. त्यामुळे हळूहळू सर्वजण शहर सोडुन निघून जात आहेत.आपल्या स्वतःच्या शहरामध्ये आपण कधीच स्थायिक होऊ शकत नाही अशा प्रकारची एक नकारात्मक भावना सर्वांमध्ये निर्माण झालेली आहे याचा गंभीर विचार व्हायला हवा.

### उद्योग व्यवसाय व कारखानदारीला चालना आवश्यक

सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे उद्योग व्यवसाय व कारखानदारी आणि त्यानिमित्ताने निर्माण होणारी रोजंदारी.आपल्या जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी उपलब्धतेनुसार जरी छोटी एमआयडीसी निर्माण झाली असली तरी जिल्ह्याचा विस्तार पाहता ती पुरेशी नाही आणि जिल्ह्यातील सुशिक्षित तरुणांना इतर शहरांचे आकर्षण न वाटता त्यांनी इथेच स्थायिक होण्याची तयारी दाखवावी इतकी आज ती दर्जेदार व आकर्षक नाही. त्यासाठी दळणवळण आणि पायाभूत सुविधा मध्ये दिली जाणारी विशिष्ट आकर्षक सूट मोठमोठ्या नामांकित कारखानदारीला आमंत्रित करायला कारणीभूत ठरेल.

### राजकीय इच्छाशक्ती अभावी मागासलेपण

ऐतिहासिक, नैसर्गिक आणि भौगोलिक अशा तीनही बाबतीत आपला जिल्हा इतर जिल्ह्यांचे बाबत श्रेष्ठ आहे, परंतु केवळ राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि नियोजन याबाबत ठोस काही होत नसल्यामुळे इतर लगतच्या शहरांच्या तुलनेत आपला जिल्हा मागासलेलाच राहिलेला आहे. एक साधा प्रश्न आहे नगर वरून पुण्याला जायला चाळीस वर्षांपूर्वी फक्त दिड दोन तास लागायचे आज चार पाच तास लागतात. या पातळीवर मागच्या ४० वर्षात साधी शटल सर्विस सुरू करावी, असे कुठल्याच राजकीय नेतृत्वाला किंवा प्रशासनाला वाटले नाही.

### सी प्लेन, नगर दर्शन बससेवेचे पुढे काय झाले?

पाच सहा, वर्षांपूर्वी देशभरातून आणि विदेशातूनही शिर्डी कडे येणाऱ्या साई भक्तांचा ओघ लक्षात घेऊन मुळा डॅमच्या पाण्यावर तरंगणारे विमान (सी प्लेन) आणून वेगळी विमानसेवा सुरू करण्याचा एक आशेचा किरण निर्माण करण्यात आला होता. त्या विमानाने फक्त एकदाच उड्डाण घेतले आणि नंतर ते हवेत कुठे गायब झाले ते आजता गायत परत दिसलेच नाही, त्याविषयी कधीच कोणती चर्चा झालेली नाही. प्रशासन, पुढारी आणि नागरीक सगळेजण ही गोष्ट विसरून गेले आहेत.

तसेच सप्टेंबर २०२१ मध्ये महानगरपालिकेने नगर शहरातील ऐतिहासिक ठिकाणांसाठी खास नगर दर्शन बस सेवा सुरू केली आणि ती ऐतिहासिक बस सेवा देखील महिनाभरात लाखो रुपयांचा बिल काढून इतिहासात जमा झाली. जगप्रसिद्ध भुईकोट किल्ला याच्या सुशोभीकरणासाठी शासनाकडून आजपर्यंत कोटी कोटी रुपये आले आणि ते भुईमध्येच गडप होऊन भुईकोट झाले. अशा प्रकारांमुळे नागरिकांमध्ये प्रचंड संताप आहे.

### कौन्सिल हॉलच्या जीर्णोद्धारासाठी मंजूर निधी कुठे गेला?

तीन वर्षांपूर्वी मी स्वतः आपल्या ऐतिहासिक जुन्या महापालिकेमधील रहस्यमयरीत्या जळालेल्या ऐतिहासिक कौन्सिल हॉलच्या जीर्णोद्धारासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करून दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यासाठी प्रयत्न केले होते. त्यानुसार तो मंजूर देखील झाला होता. परंतु त्याबाबत देखील त्या योजनांचे नंतर काय झाले याविषयी कुठेही कसलीही चर्चा परत झालेली नाही. मुख्य म्हणजे हा विषय जिल्हा नियोजनाच्या अखत्यारित होता.

### ऐतिहासिक वस्तूंची झालीय दयनीय अवस्था

शहरामध्ये ज्या ज्या वास्तू ऐतिहासिक म्हणून घोषित झालेल्या आहेत, त्या वास्तूंच्या शंभर मीटर परिसरामध्ये कुठल्याही इमारतीला बांधकाम परवानगी न देण्याचा नियम देखील वादग्रस्त अवस्थेत आहे. आणि ज्या ऐतिहासिक वास्तूंच्या जतन करण्याचे कारण पुढे सांगितले जाते त्या ऐतिहासिक वास्तू देखील दयनीय अवस्थेमध्ये आहेत. या प्रकारामुळे शहरांमध्ये बेकायदेशीर बांधकामांना चालना मिळाली आहे आणि विकास देखील खुंटला आहे. नेहरू मार्केट सारख्या ज्या ऐतिहासिक वास्तू जमीनदोस्त करण्यात आल्या त्याबाबत देखील अद्याप दहा वर्षानंतरही कुठलाही प्रकारचा ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. नुसतीच आंदोलने होतात बैठका होतात असे दहा वर्षापासून चालू आहे.

नगर हे ऐतिहासिक याच पदवीने प्रसिद्ध असल्यामुळे पुरातत्त्व विभागाला खरी काम करायची संधी तर आपल्याच जिल्ह्यामध्ये आहे, परंतु पुरातत्त्व विभाग कुठल्याच बाबत कधीच कार्यरत असल्याचे दिसत नाही, सर्व छोट्या–मोठ्या ऐतिहासिक वास्तूंचे पूर्णतः खंडहर झालेले दिसत आहे. शहराच्या गावठाणा मध्ये आणि दूर दूर पसरलेल्या ठिकाणी देखील प्रत्येक ऐतिहासिक वास्तूला भेट देऊन त्याची अवस्था पाहण्यात यावी.

वेरूळ, अजिंठा किंवा महाबळेश्वर पाचगणी अशा ठिकाणी पर्यटन महोत्सव घेतले जातात, त्यामध्ये स्थानिक जिल्हाधिकारी प्रशासन व पुरातत्त्व विभागाचा फार मोठा पुढाकार देखील असतो परंतु ऐतिहासिक अशा आपल्या शहरात असे काही महोत्सव होऊन काही गोष्टी बाबत काही नेत्र दीपक विकास किंवा सुधारणा झाल्याचे कधीच ऐकण्यात आलेले नाही.जे महोत्सव पुर्वी झाले ते एका दिवसासाठी सरकारी फाईल मध्ये कागद लावण्यासाठी झालेले आहेत.

वास्तविक इतर राज्यांमध्ये जशा पर्यटनाच्या वेबसाईट जाहिरात म्हणून पर्यटन स्थळांसाठी वापरण्यात येतात तशी वेबसाईट खास अहमदनगर साठी असायला हवी. रेहेकुरी अभयारण्य, भंडारदरा अशा ठिकाणच्या परवानग्या फोन नंबर संपर्क अधिकारी हे कोणालाच माहीत नसतात, त्यामुळे ती ठिकाणे दुर्लक्षितच राहतात.

### सीसीटीव्ही कॅमेरे प्रकल्पही ठरतोय अयशस्वी

जिल्हा विकास नियोजनाच्या माध्यमातून शहरांमध्ये ठिकठिकाणी चौका चौकामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा एक प्रकल्प नुकताच राबविण्यात आला, तो पूर्ण कार्यक्षमतेने कार्यान्वित करून राबवण्यामध्ये पूर्णपणे अयशस्वी झालेला दिसतो आहे. कारण त्याची सेंट्रल कनेक्टिव्हिटी त्याचे रेकॉर्ड व उपयोग याबाबत सगळी साशंकता आहे. त्याबाबत खुलासा व्हावा.

जिल्हा नियोजन विकास बैठकीमध्ये या गोष्टींची दखल घेऊन यावर अंमलबजावणी होण्याबाबत काही निर्णय झाल्यास शहरातील आणि जिल्ह्यातील नागरिक निश्चितच आपणास आशावादी राहून धन्यवाद देतील.

अशा पद्धतीने उद्योग, कारखानदारी, रोजगार, व्यवसाय, वाहतूक, दळणवळणाची साधनं, पर्यटन, पर्यावरण, अशा सर्व बाजूने जिल्ह्याच्या विकास नियोजनाचा आराखडा आखण्यात यावा, आणि मुख्य म्हणजे नुसतेच मिटिंगा न घेता प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी तयार करावा अशी नगरकरांकडून विनंती आहे, असे सुहास मुळे यांनी बैठकीत नमूद केले. यावेळी भूषण देशमुख, ज्ञानेश शिंदे यांनी देखील विविध सूचना मांडल्या आहेत.



भुईकोट किल्ल्याच्या विकास कामात शिवछत्रपतींच्या वंशजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नगरमधील ऐतिहासिक स्थळांचा समावेश करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करताना इतिहास प्रेमी मंडळाचे अध्यक्ष आसिफ दुलेखान, इंजि. अभिजीत वाघ, भैरवनाथ वाकळे आदी.

# शिवछत्रपतींच्या वंशजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ऐतिहासिक स्थळांचा विकास करा : जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

नगर – नगरच्या भुईकोट किल्ला विकासासाठी शासनाकडून निधी प्राप्त झाला असल्याचे समजले असून त्यात नेताकक्ष व इतर काही विकासाची कामे करण्यात येणार आहेत. या कामांमध्ये शिवछत्रपतींच्या वंशजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नगरमधील ऐतिहासिक स्थळांचा समावेश करण्याची मागणी इतिहास प्रेमींनी केली आहे.

याबाबत इतिहास प्रेमी मंडळाचे अध्यक्ष आसिफ दुलेखान, इंजि. अभिजीत एकनाथ वाघ, भैरवनाथ वाकळे यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची भेट घेवून याबाबतचे निवेदन दिले आहे. यामध्ये म्हटले आहे की, नगरच्या भुईकोट किल्ल्यात स्वराज्य महाराणी येसुबाई, छत्रपती संभाजी महाराजपुत्र छत्रपती शाहू हे, तर आरक्षणाचे जनक राजर्षी शाहु महाराज यांचे वडील चौथे छत्रपती शिवाजी महाराज हे ब्रिटीशांनी कैदेत ठेवले होते. याच ठिकाणी चौथे शिवाजी महाराजांची हत्या झालेली आहे. या वास्तूंचा सुध्दा विकासकामात समावेश झाला पाहिजे.

शिवछत्रपतींच्या पाऊलखुणा पुसू न देणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. यामुळे संपूर्ण देशभरातून पर्यटक नगरला येतील. शिवरायांच्या वंशजांचा इतिहास जाज्वल्य आहे. आपण नगरकरांनी याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. याचा विचार करून विकासात्मक कामात या गोष्टींचा समावेश करावा, ही मागणी इतिहासप्रेमी मंडळाने निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.



शेवगाव शहरातील विद्याताई गाडेकर यांनी शिवसेना शिंदे गटांमध्ये महिलांसोबत मुंबई येथे माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत ध्वज देऊन प्रवेश केला. यावेळी महिला उपस्थित होत्या.

# हिवताप योजनेचे हस्तांतरण व बायोमेट्रिक फेस रीडिंग कार्यप्रणालीस राज्यातील कर्मचाऱ्यांचा 'तीव्र विरोध'; ९ एप्रिलला करणार 'निदर्शने'

नगर – राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबी जिल्हा परिषद प्रशासनाकडे हस्तांतरण करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने २२ नोव्हेंबर २०१९ ला परिपत्रक काढले होते. या परिपत्रकातील काही बाबी कर्मचाऱ्यांवर अन्यायकारक ठरत असल्याने तत्कालीन परिस्थितीत संघटनेने तीव्र विरोध केला. सनदशीर मार्गाने आंदोलने केली. हजारोंच्या संख्येने कर्मचारी आक्रोश मोर्चा नागपूर विधानभवनावर धडकले. हिवताप योजनेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबी जिल्हा परिषद प्रशासनाकडे सोपविल्यास प्रशासनिक कार्यात गुंतागुंत निर्माण होवून अनेक अडचणी निर्माण होणार असल्याने कर्मचाऱ्यांचा प्रखर विरोध लक्षात घेता शासनाने सदर परिपत्रक स्थगित केले.

हिवताप योजनेतील कर्मचारी केवळ हिवताप कार्यक्रमापुरतेच मर्यादित कार्य करीत नसून साथरोग संसर्गजन्य रोग असंसर्गजन्य रोग व कुटुंब कल्याण कार्यक्रम आदी बहुउद्देशीय आरोग्य विषयक कार्य जिल्हा प्रशासनाअंतर्गत जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे नियंत्रणाखाली व मार्गदर्शनाखाली उत्कृष्टपणे करीत असून जनतेला गुणात्मक आरोग्यसेवा पुरवित आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागाचे अधिपत्याखालील सर्व आरोग्य कार्यक्रमांचे कार्य व्यवस्थित व सुरळीत चालू असताना सहसंचालक आरोग्य सेवा (हि. ह. वजरो) पुणे– ६ यांनी २६ मार्च २०२५ चे पत्रानुसार शासनाने – दिलेल्या निर्देशाप्रमाणे तत्कालीन शासनाने २२ नोव्हेंबर २०१९ चे परिपत्रकाची अंमलबजावणी करण्यास सर्व संबंधितांना आदेशित केलेले आहे. वास्तविक या परिपत्रकास ६ वर्षापूर्वी शासनाने स्थगिती दिलेली आहे. सत्तांतरणानंतर परत सदर परिपत्रकाची अंमलबजावणी करण्याची गरज का निर्माण झाली. असा प्रश्न उपस्थित होत आहे ही कार्यप्रणाली नियमाप्रमाणे संयुक्तिक दिसून येत नाही. हिवताप योजनेतील कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबी, वेतन व भत्ते, भविष्य निर्वाह निधीचे व्यवहार, पतसंस्थेची वसुली, प्रशासनिक कार्यप्रणाली, सेवानिवृत्ती प्रकरणे यामध्ये अनेक अडचणी येवुन गुंतागुंत निर्माण होणार आहे. सद्यस्थितीत या सर्व बाबी व्यवस्थित हाताळल्या जात असल्याने आरोग्य सेवेतील सर्व आरोग्य कार्यक्रमांचे कार्यसुद्धा व्यवस्थित व सुरळीत चालू आहे. जनसामान्यांना आरोग्य सेवा पुरविण्याचे गुणात्मक कार्य या योजनेतील कर्मचारी प्रामाणिकपणे करीत आहेत. यास्तव २६ मार्च २०२५ चे पत्राला स्थगिती देण्याची आग्रही मागणी या संघटनेने केली आहे.

तसेच आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना १ एप्रिल २०२५ पासून शासनाने फेस रीडिंग बायोमेट्रिक हजेरी लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे अनुषंगाने शासनाकडून योग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या गेल्या नसल्याने कर्मचाऱ्यांना अनेक अडचणी व समस्यांचा सामना करावा लागणार आहे. ग्रामीण व आदिवासी क्षेत्रामधील बऱ्याच ठिकाणी इंटरनेटची सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे क्षेत्रिय कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अनेक समस्या निर्माण होणार आहेत. त्यामुळे रुग्णसेवेवरसुद्धा विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे फेस रिडिंग बायोमेट्रिक हजेरीची कार्यवाही थांबविण्यात यावी, अशीही मागणी या संघटनेने शासन व प्रशासनाकडे केलेली आहे परंतु अद्याप यावर तोडगा निघाला नसल्याने कर्मचाऱ्यांच्या तीव्र भावना लक्षात घेऊन या संघटनेचे नेतृत्वाखाली राज्यातील हिवताप कर्मचारी ९ एप्रिल २०२५ ला संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दुपारी २ ते ४ लक्षवेध आक्रोश निदर्शने करणार आहेत. या आंदोलनाची वेळीच दखल शासन व प्रशासनाने न घेतल्यास घेतल्यास भविष्यात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही संघटनेने दिलेला आहे. हे आक्रोश निदर्शने कर्मचाऱ्यांचे हक्क व अधिकार अबाधित ठेवून भविष्यात अन्यायाविरुद्ध लढा उभारण्यासाठी असल्याने या प्राथमिक आंदोलनामध्ये सहभागी होऊन यशस्वी करण्याचे आवाहन राज्याध्यक्ष आर.एन. सोनार, राज्य सरचिटणीस डी.एस.पवार, उपाध्यक्ष प्रदीप चंदे, पी.के.आडेप, दिपक गोतमारे यांनी केले आहे.

# बँकांमधील सर्व व्यवहार मराठीतून करून सर्व कागदपत्रे, स्लिपा या मराठी भाषेत करा

## इंग्रजी भाषेतील स्लिपा मनसे विद्यार्थी सेनाने फाडून शाखाधिकाऱ्यांच्या टेबलावर टाकल्या

नगर – मराठी भाषेला आता अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. त्यामुळे मराठी भाषेचा आदर करून बँकांमधील सर्व व्यवहार मराठीतून करून सर्व कागदपत्रे, स्लिपा या मराठी भाषेत करा. तसेच बँकेत ८० टक्के कर्मचारी हे स्थानिक मराठी भाषिकच असावेत या मागण्यांसाठी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना आक्रमक झाली आहे. बँकेचा कारभार जास्तीत जास्त मराठी भाषेतून न झाल्यास पूर्व कल्पना न देता मनसे स्टाईल आंदोलन करू असा इशाराही विद्यार्थी सेनेचे राज्य उपाध्यक्ष सुमित वर्मा यांनी दिला आहे.



बँकांमधील सर्व व्यवहार व कागदपत्रे मराठीतून करण्यासाठी मनविसेचे राज्य उपाध्यक्ष सुमित वर्मा यांनी बँक ऑफ बडोदा शाखेच्या शाखाधिकाऱ्यांना निवेदन देत इशारा दिला आहे.

पदाधिकाऱ्यांनी सुमित वर्मा यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी अहिल्यानगर शहरातील माणिक चौकातील बँक ऑफ बडोदा बँकेच्या शाखेत आंदोलन करून शाखाधिकाऱ्यांना वरील मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी पदाधिकारी आक्रमक होऊन बँकेच्या इंग्रजी भाषेतील स्लिपा फाडून शाखाधिकाऱ्यांच्या टेबलावर टाकल्या. जर बँकेतील सर्व व्यवहार मराठी भाषेतून केले नाहीतर मनसे स्टाईल आंदोलन करू, असा इशारा यावेळी दिला. यावेळी जिल्हाध्यक्ष श्रद्धा खोंडे, शहर उपाध्यक्ष प्रविण गायकवाड, तालुका अध्यक्ष अक्षय बेरड, तालुका उपाध्यक्ष रोमन भागवत, आकाश गवते, नागापूर विभाग प्रमुख आयुश नागरे आदींसह सैनिक उपस्थित होते.

# महापालिका क्षेत्रातील सर्व हॉस्पिटल्स्चे ऑडिट करण्यात यावे

**मनपा आयुक्तांना मनसेचे निवेदन**

नगर – नुकत्याच पुणे येथे झालेल्या पंडित दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलच्या हलगर्जीपणामुळे एका गर्भवती महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. घडलेल्या घटनेला दोषी कोण हे लवकरात तपासातून आपल्या सगळ्यांच्या समोर येईलच. अशी कोणती दुर्दैवी घटना ही आपल्या अहिल्यानगर शहरात घडू नये यासाठी महानगरपालिका क्षेत्रात असणाऱ्या सर्व हॉस्पिटल्स सुपर स्पेशलिस्ट हॉस्पिटल चॅरिटेबल हॉस्पिटल येथे लागू असणारच विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी होत आहे की नाही, तिथे येणाऱ्या नागरिकांची कुठल्या प्रकारच्या पिळवणूक तर होत नाही. याची माहिती घेण्यासाठी पालिकेच्या वतीने एक समिती नेमण्यात यावी. व या समितीस काही गैर आढळून आल्यास दोशींवर कडक शासन करण्यात यावे.



महानगरपालिका क्षेत्रातील सर्व हॉस्पिटल व मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल यांचे ऑडिट करण्यात यावे याबाबत मनसेचेच्या वतीने उपायुक्त यांना निवेदन देण्यात आले.

महानगरपालिका क्षेत्रातील सर्व हॉस्पिटल व मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल यांचे ऑडिट करण्यात यावे, याबाबत मनसेचे च्या वतीने मनपा उपायुक्त यांना निवेदन देण्यात आले. यावेळी शहर उपाध्यक्ष किरण रोकडे, संकेत पाळंदे, वृषभ साबळे, प्रतीक कदम, साहिल पगारे, विशाल अरुण आदी उपस्थित होते

शहर अध्यक्ष गजेंद्र राशीनकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन देण्यात आले.

# मालमत्ताधारकांनी एप्रिल महिन्यात कर भरून १० टक्के सवलतीचा लाभ घ्यावा : मनपा आयुक्त

## शहरात नवीन वर्षातील कर वसुलीला सुरुवात; कर भरणाऱ्या पहिल्या ५ मालमत्ताधारकांचा सत्कार

नगर – नागरिकांच्या सकारात्मक प्रतिसादामुळे मागील आर्थिक वर्षात महानगरपालिकेने विक्रमी कर वसुली केली आहे. आता नवीन वर्षात १०० कोटी वसुलीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून कर भरणा सुरू झाला आहे. सावेडी प्रभाग समिती कार्यालयात आगाऊ कर भरणाऱ्या पाच नागरिकांचा सत्कार करण्यात आला आहे. मालमत्ताधारकांनी नियमित कराचा भरणा करावा व एप्रिल महिन्यात देण्यात येणाऱ्या संकलित करावरील १० टक्के सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

महानगरपालिका प्रशासनाकडून नवीन आर्थिक वर्षातील कराची बिले तयार केली जात आहेत. लवकरच त्याचे वितरणही सुरू होणार आहे. एप्रिल महिन्यात संकलित करावर १० टक्के सवलत दिली जाते. नियमित कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांनी बिले तयार होण्याआधीच आगाऊ कर भरण्यास सुरुवात केली आहे. त्यांना सवलतीचा लाभ देण्यात आला असून सावेडी प्रभाग समिती कार्यालयात त्यांचा सत्कारही करण्यात आला आहे. नागरिकांच्या सोयीसाठी प्रत्येक शनिवारी, तसेच सर्व शासकीय सुट्टीच्या दिवशी दुपारी २ वाजेपर्यंत वसुलीचे कामकाज व कार्यालय सुरू राहणार आहेत.

नवीन आर्थिक वर्षात महानगरपालिकेने १०० कोटींच्या वसुलीचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यादृष्टीने वसुलीचे नियोजन सुरू आहे. या आर्थिक वर्षात महानगरपालिकेने शास्तीमध्ये सवलत न देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे थकबाकी – दारांनीही तत्काळ थकीत कराचा भरणा करावा. थकबाकीदारांची यादी तयार करण्यात येत आहे. पुढील आठवड्यापासून थकबाकीदारांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले आहे.



सावेडी प्रभाग समिती कार्यालयात आगाऊ कर भरणाऱ्या पाच नागरिकांचा सत्कार करण्यात आला.

# हनुमान जन्मोत्सवा निमित्ताने नित्यसेवा सोसायटीत विविध धार्मिक कार्यक्रम

**श्री संकट मोचन हनुमान सेवा संस्था ट्रस्टच्यावतीने आयोजन**

नगर – शहरातील नित्यसेवा सोसायटी येथील श्री संकट मोचन हनुमान सेवा संस्था ट्रस्टच्यावतीने हनुमान जन्मोत्सवा निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यात ९ एप्रिलला रात्री ८ ते ११ हनुमान चालीसा पठण होऊन कावड प्रस्थान होईल.

१० एप्रिलला श्री संत निळोबाराय महाराज चरित्र, शुक्रवार ११ एप्रिलला कावड आगमन होऊन भव्य मिरवणूक सोहळा होईल. शनिवारी १२ एप्रिलला हनुमान जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त पहाटे ५ वाजता श्रींच्या मूर्तीस कावडीने आणलेल्या पाण्याने अभिषेक घालण्यात येईल. सकाळी ६ वा. हनुमान जन्मोत्सव सोहळा, सकाळी ९ ते ११ वेळेत होमहवन व पुर्णाहुती, दुपारी १२ ते १ वेळेत महाआरती, सायं. ६.०० ते ८.०० वेळेत ह.भ.प. ईश्वर महाराज जगताप यांचे काल्याचे किर्तन होईल. मृदुंगाचार्य ह.भ.प महेश महाराज साके, गायनाचार्य ह.भ.प. महेश महाराज जायक, ह.भ.प. प्रविण महाराजे साके, ह.भ.प. बाळु महाराज पोकळे आदी साथ संगत करतील.

कीर्तनानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार असून सर्वांनी लाभ घ्यावा.

